चला स्विमिंग ला... स्विमिंग सुट, गॉगल, स्विमिंग कॅप, बरमुडा स्विमिंग लेगींग्ज टॉप, व बरेच काही
जरीवाला ▸ कापड बाजार, फोन नं. 7666510765 ▸ यशोदानगर, पाईपलाईन रोड, ▸ सिंहगड रोड, त्रिमुर्ती हॉस्पिटल जवळ, योगेश मेडीकल शेजारी, पुणे. मो. 7775089505



संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, सोमवार दि. ०५.०५.२०२५ | अंक नं. २९ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720 Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अँण्ड मार्बल इंडस्ट्रिज

फक्त फायदाच फायदा !
खरेदीवर पॉइंट पॉइंट्सवर गिफ्ट
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

22 कॅरेट सोन्याचा सर्वात कमी दर
दागिन्यांच्या मजुरीवर 20%* पर्यंत सूट
ठुशी, कुंदन ज्वेलरीच्या मजुरीवर 50%* पर्यंत सूट
आपला जुना दागिना एक्सचेंज करा आणि मिळवा 100%* किंमतीचा परतावा.
चंदुकाका ज्वेल्स सोनेरी नातं..
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02

# सीना नदीवरील नवीन पुलाचे काम रखडले; पावसाळा तोंडावर आला तरी काम पूर्ण नाही

## कल्याण रोड परिसरात राहणाऱ्या नागरिकांना या वर्षीही करावा लागणार पुराच्या पाण्याचा सामना

नगर - नगर-कल्याण महामार्गावरील नेप्ती नाका येथील सीना नदीवरील पुलाचे काम गेल्या काही दिवसांपासून अतिशय संथ गतीने सुरु असून, हे काम रखडल्याने आणि पावसाळ्यापूर्वी ते पूर्ण होण्याची शक्यता मावळल्याने या वर्षीही पावसाळ्यात वाहनचालकांना तसेच कल्याण रोड परिसरात राहणाऱ्या नागरिकांना सीना नदीच्या पुराच्या पाण्याचा सामना करावा लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

कल्याण रस्त्यावरील सीना नदीवरील सध्याचा पूल ३०-३५ वर्षांपूर्वीचा असून, त्याची दुरवस्था झाल्याने तो रहदारीसाठी अत्यंत धोकादायक बनलेला आहे. दरवर्षी पावसाळ्यामध्ये हा पूल पाण्याखाली जात असल्यामुळे वाहतूक १५ ते १८ तास बंद ठेवावी लागते, त्यामुळे नागरिकांची गैरसोय होते. पुलावर पथदिव्यांसह इतर सुविधा नसल्याने व जागोजागी खड्डे पडल्याने वाहन चालविताना प्रवाशांना मोठी कसरत करावी लागते. याचबरोबर वारंवार अपघातही होत आहेत. तसेच पुलाची उंची कमी असल्याने पूर आल्यास पाण्याचा अंदाज येत नसल्यामुळे दुर्दैवी घटनाही घडलेल्या आहेत.

सदर रस्ता कल्याण-विशाखापट्टणम राष्ट्रीय महामार्ग असल्याने, या पुलाचे काम मार्गी लागण्यासाठी २ वर्षांपूर्वी आमदार संग्राम जगताप तसेच तत्कालीन खासदार डॉ.सुजय विखे पाटील यांनी केंद्रीय वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. या पाठपुराव्यामुळे मे २०२३ मध्ये या कामाला मंजुरी मिळाली. त्यासाठी २३ कोटी ४२ लाख ६४ हजार ७९७ रुपये निधी उपलब्ध करून देण्यात आला. नेप्ती नाका ते कल्याण रस्ता सीना नदीवरील पुलाचे काम मार्गी लागल्यानंतर या भागाच्या विकासाला अधिक गती प्राप्त होणार आहे.

पुलाचे काम मार्गी लागल्यानंतर या परिसराचे सुशोभीकरण करण्यात येणार असून, त्यामुळे शहराच्या सौंदर्यात भर पडणार आहे. नेप्ती नाका ते ठाणगे पेट्रोल पंपापर्यंत पुलाची उंची वाढवून रस्त्याचे काम केले जाणार आहे. या कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन नोव्हेंबर २०२३ मध्ये या कामाला सुरुवात करण्यात आली होती.

*(पुढील मजकूर व छायाचित्र पान २ वर)*

BIPIN GAVHANE STOCK MARKET ACADEMY
Our Training Details
▪ Basics Of Stock Market
▪ Indicators & Candlesticks Pattern
▪ Technical Analysis
▪ Future & Options
▪ Commodity Market
▪ Forex Market
OPP. New police Headquarters Balikashram Road, Ahilyanagar.
Mob.: 9763206009

पॅरालेसिस, कंबर दुखी व गुडघेदुखी पेशंटसाठी निसर्गोपचाराद्वारे उपचार केले जाईल.
मसाज स्टीम बाथ उपलब्ध 8421689792

पुरुषांसाठी जम्बो साईज
टी-शर्ट/शर्टस् फॉरमल पँट/ट्राऊजर्स व सर्व प्रकारचे कपडे डिस्काउंट रेटमध्ये भरपूर व्हरायटीज्
ऑनलाईन पेक्षा स्वस्त
अहिल्यानगर शहरातील भव्य मॉल पुरुषांसाठी सर्व काही शुभ मॉल
मयुरी लेडिज मॉलच्या वर मल्हार चौक, आयकॉन पब्लिक स्कूल जवळ, आगरकर मळा, अहमदनगर. ९०२८२०११८८

महेंद्र पेडावाला रजवाडी गुजराती थाळी
दालबाटी व चुरमा
आमरसचा बेत
हापुस आमरस 400/- किलो
कापड बाजार, अहिल्यानगर.

उठाला (रसम)



स्व.डॉ.विजय खन्ना
आप सब को सूचित करते है की, डॉ.विजय खन्ना का इनका शनिवार ता. ३/५/२०२५ को स्वर्गवास हुआ है ।
❋ उठाला रसम कार्यक्रम ❋
मंगलवार ६/५/२०२५ को
समय : दोपहर १२ बजे से १ बजे तक
स्थान : गुरुद्वारा भाई दयासिंगजी (गुरुद्वारा गोविंदपुरा) अहिल्यानगर.
- शोकाकूल -
समस्त खन्ना परिवार. अहिल्यानगर



Lotus Healing Palliative & Nursing Care
लोटस हीलिंग पॅलिएटिव्ह आणि नर्सिंग केअर
सर्व प्रकारच्या परावलंबी आणि वयोवृद्ध रुग्णांसाठी हक्काच घर !!!
कामानिमित्त बाहेरगावी जायचंय किंवा सुट्टीसाठी बाहेर फिरायला जायचंय घरातील वृद्ध आणि आजारी व्यक्तींची काळजी वाटतेय. आता काळजी नको.
डॉ. मनिषा शिरसाट यांचे लोटस हीलिंग पॉलिएटलिव्ह आणि नर्सिंग केअर मध्ये DAY care आणि पुर्णवेळ परावलंबी, आजारी आणि वृध्द व्यक्तींनी काळजी घेण्यासाठी आणि राहण्यासाठी उत्तम व वाजवी दरात सोय उपलब्ध
डॉ. मनिषा शिरसाट
MBBS. DA, ICU Specialist & Anaesthesiologists
२४ तास सेवा | योग्य दरात सेवा | अनुभवी स्टाफ | तज्ञ डॉक्टर | योगा वर्ग | आहार मार्गदर्शन
3D कॉर्नर, शिवाजी नगर, तपोवन मंदिराजवळ, तपोवन रोड, अहिल्यानगर
Phone - 9860177559

तृतीय पुण्यस्मरण



स्व. सौ. निलीमा अभयकुमार बोरा
जन्म. दि. १८ डिसेंबर १९६७ । स्वर्गवास दि. ०५ मे २०२२
प्रेमाने विश्व जिंकुनी, किर्ती सुगंधाचा वृक्ष फुलवूनी.. सुसंस्कार, समय सूचकता, सर्वांवर असलेली प्रेमभावना, लोभ, माया, प्रिती, देवूनी, सर्वांची मने जिंकूनी.. अमर जाहला आपण जीवनी..!
अभयकुमार रतनचंदजी बोरा | विजयकुमार - सौ. वैशाली बोरा
सौ. श्रुती - निखलजी कटारिया, | प्रतिक - सौ. समृध्दी बोरा
प्रणव - सौ. निकिता बोरा | सौ. प्राची - सुयशजी भुतडा,
रुही प्रतिक बोरा | सनव निखलजी कटारिया
बोरा परिवार (मिरजगाववाला)
फर्म : अभयकुमार मशिनरी कंपनी
७, नवजीवन कॉलनी, मार्केटयार्ड मागे, अ.नगर.
मो. 9422225122 / 9423791339

सोळावे पुण्यस्मरण



हास्य तुझ्या चेहऱ्याचे आठवे पावलो पावली..
प्रेम दिले परिवाराला पण हरवली मायेची सावली...
तुझे संस्कार व शिकवण आम्हाला सैदव बळ देत राहील...
आई, तुझ्या प्रेमळ स्मृतीस भावपूर्ण आदरांजली !
स्व. प्रफुल्ला नरेंद्र पंड्या (माजी उपनगराध्यक्षा) स्व.दि. ५/५/२००९
मुंजोबा स्वीटस्
पंकज नरेंद्र पंड्या व पंड्या परिवार
मार्केट यार्ड चौक, स्टेशन रोड, अहमदनगर. फोन: २३४६८४८.

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# शेतकरी कर्जमाफी व इतर घोषणांची पूर्तता करा

## चौंडी येथील मंत्रिमंडळाच्या बैठकीत मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांना निवेदन देणार

नगर - चौंडी (ता. जामखेड) येथे ६ मे रोजी राज्य मंत्रिमंडळाची बैठक होणार आहे. या बैठकीस मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि सर्वच मंत्री उपस्थित राहणार आहेत. या पार्श्वभूमीवर भारतीय कम्युनिस्ट पक्ष व अखिल भारतीय किसान सभेच्या वतीने शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी निवेदन देण्यात येणार आहे.

भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राज्य सचिव ॲड. सुभाष लांडे, जिल्हा सचिव ॲड. बन्सी सातपुते, ॲड. सुधीर टोकेकर, संतोष खोडदे, संजय नांगरे, अखिल भारतीय किसान सभेचे जिल्हाध्यक्ष कॉ. बबनराव सालके, सेक्रेटरी आप्पासाहेब वाबळे व उपाध्यक्ष बापूराव राशिनकर यांनी ही माहिती दिली.

विधानसभा निवडणुकीच्या काळात शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफीचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सध्या कर्जमाफी शक्य नसल्याचे स्पष्ट केल्यामुळे शेतकरी वर्गात मोठ्या प्रमाणावर नाराजी व्यक्त होत आहे. याबाबत सरकारला जाग आणण्यासाठी भारतीय कम्युनिस्ट पक्ष व किसान सभेचे शिष्टमंडळ मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांना भेटून निवेदन देणार आहे.

राज्य सरकारने निवडणुकीच्या वेळी बेरोजगार तरुणांना दरमहा १० हजार रुपये भत्ता देण्याचे आश्वासन दिले होते. तसेच लाडकी बहिण योजनेअंतर्गत महिलांना दरमहा २१०० रुपये देण्याची घोषणा केली होती. या आणि अशा अनेक घोषणांची अद्याप अंमलबजावणी झालेली नाही. त्यामुळे या घोषणांची त्वरीत अंमलबजावणी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निवेदन देण्यात येणार आहे.

## प्रेरणादायी अक्षरधन...






### चिंताजनक वास्तव... जागे व्हावे लागेल

ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ संदीप वाकचौरे यांचा लेख वाचण्यात आला. काही दिवसांपूर्वी नाशिक जिल्ह्यातील एका माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या दप्तरात कंडोम, पत्त्याचे कॅट, चाकू, फायटर, सायकलची चेन अशा काही वस्तू सापडल्याचे अनेक वृत्तपत्रांतून समोर आले आहे.

ही मुले ८ वी ते १० वीच्या वर्गात शिकणारी आहेत. यामुळे शिक्षण क्षेत्रात धक्का बसलाय. अर्थातच या घटनेने खडबडून जागे व्हावे लागेल. अन्यथा शिक्षणाच्या व काही मुलांच्या भविष्याची वाट अधिक कठीण असण्याची शक्यता आहे.

लहान वयात विद्यार्थी हिंसक बनत आहे. वयापेक्षा लवकर प्रौढत्व येत आहे. वाममार्गाकडे या मुलांचा प्रवास सुरू झालाय. आईवडिलांचा उद्धार केल्याशिवाय तर हे सहजही बोलत नाही!

या सर्व वाईट समस्यांमागे कारण म्हणजे कौटुंबिक सुसंवादाचा वाढता अभाव आणि वाढता स्क्रीन टाईम. विद्यार्थी दिवसभर मोबाईल, दूरदर्शन, न्यूज चॅनेल (यांनी दररोज किमान २ वेळा प्रेरणादायी बातम्या, आदर्श, कार्यक्रम - निदान १०/२० मिनिटांची दाखवली तर...) आणि सोशल माध्यमांवर हिंसक घटना पाहात आहेत.

रोज हाणामाऱ्या, भ्रष्टाचार, राजकीय कुरघोड्या, द्वेष, मत्सर, आत्महत्या, सेक्स, जुगार, रमी, पत्ते खेळा या गोष्टी जर मुलेच काय समाजापुढे येत असतील तर हळूहळू समाज नितीभ्रष्ट व हिंसक होण्याची भिती आहे.

विवेकाची पेरणी करणाऱ्या, संस्काराच्या गोष्टी आज घरी-दारी, शाळेत सांगितल्या जात नाही. मुलांना मनातील भावभावनांच्या गोष्टी मुक्तपणे संवाद करता येत नाही. सारे दबलेल्या मनःस्थितीत व विवेकशून्य बनत चाललेत.

आता वेळ आली आहे कुटुंब सदस्य, प्रमुखांसह शिक्षकांनी मुलांना जपण्याची, त्यांना खुलवण्याची..

मोबाईलपेक्षा त्यांना तुम्ही जवळचे वाटला पाहिजे. हीच वेळ आहे... जागे होण्याची.

**- मुसाफिर**

# अहिल्यादेवी होळकरांच्या स्मरणार्थ राज्यात एकल महिला सर्वेक्षण व्हावे

## मंत्रिमंडळ बैठकीकडे साऊ समितीची मागणी

नगर - अहिल्यादेवी होळकर यांची ३०० वी जयंती साजरी होते आहे. सरकारही त्यांना अभिवादन करण्यासाठी थेट मंत्रिमंडळ बैठक त्यांच्या जन्म स्थानी करत आहे. यानिमित्ताने सरकारने एकल महिला पुनर्वसन हा कार्यक्रम घ्यायला हवा.

अहिल्यादेवी या एकल महिला होत्या. एक एकल महिला किती मोठे कर्तृत्व गाजवू शकते याचे त्या वस्तुपाठ आहेत. एकल महिलांसाठी त्या प्रेरक आहेत. तेव्हा त्यांच्या स्मरणार्थ एकल महिला पुनर्वसन धोरण व्हावे.

महाराष्ट्रात आज विधवा, परित्यक्ता, घटस्फोटित महिलांची संख्या खूप मोठी आहे. या महिलांचे पुनर्वसन करण्यासाठी, सरकारने धोरण आखण्यासाठी त्यांची संख्या पुढे येणे आवश्यक आहे. त्यामुळे राज्यातील एकल महिलांचे सर्वेक्षण होणे आवश्यक आहे. अहिल्यादेवी यांचे स्मरणार्थ त्यानुसार धोरण तयार होऊ शकेल.

### एकल महिलांची संख्या किती असू शकते ?

देशाच्या २००१ च्या जनगणनेत एकल महिला ५ कोटी तर २०११ साली ७ कोटी ३० लाख होत्या. महाराष्ट्रात आज ही संख्या प्रचंड असू शकते याचा एक पुरावा देत आहे..

अहिल्यादेवी यांचे जन्मस्थान ज्या अहिल्यानगर जिल्ह्यात आहे. त्या अहिल्यानगर जिल्हा परिषदेने दोन वर्षापूर्वी ग्रामपंचायत स्तरावर एकल महिलांचे सर्वेक्षण केले. तेव्हा फक्त ग्रामपंचायत स्तरावर या एकल महिलांची संख्या १ लाख ७ हजार निघाली. त्यात १५ तालुक्यातील नगरपंचायत, नगरपालिका, महापालिका ही संख्या मिळवली तर ती संख्या २ लाख असू शकते...ही एका जिल्ह्याची स्थिती आहे.

जर एका जिल्ह्यात दोन लाख एकल महिला असतील तर राज्यात ३६ जिल्ह्यात एकल महिलांची संख्या ७० लाखापेक्षा जास्त असू शकते आणि पुणे, मुंबई, नागपूर, संभाजीनगर सारख्या मोठ्या शहरातील मोठी संख्या बघता एकूण संख्या ८० लाखापेक्षा जास्त असू शकते. त्यांच्यावर अवलंबून असणारी दोन मुले धरली तर राज्याच्या लोकसंख्येत ही खूप लक्षणीय असेल.

शेतकरी आत्महत्येत मृत्यू झालेले ५० हजार शेतकरी (अपात्र आत्महत्येची संख्या अजून जास्त) कोरोनात महाराष्ट्रात झालेले सर्वात जास्त मृत्यू आणि दारूने गावोगावी मोठ्या संख्येने मरणारे तरुण बघता ही एकल महिलांची संख्या खूप वाढली आहे. त्यामुळे एकल महिलांच्यासाठी धोरण तयार करण्यासाठी शासनाने सुरुवात म्हणून राज्यात एकल महिलांचे सर्वेक्षण करून अहिल्यादेवी यांच्या स्मरणार्थ भरीव कृती करावी. हे सर्वेक्षण करण्यासाठी फार खर्च ही येणार नाही. ग्रामपंचायत क्षेत्रात त्या छोट्या गावात ग्रामसेवक, अंगणवाडी सेविका, आशा सेविका यांच्याकडे गावातील एकल महिला माहिती असतेच. ती फक्त वयोगटानुसार संकलन करायची आहे. शहरी भागात वॉर्ड ऑफिसर, अंगणवाडी व स्वयंसेवी संस्था मदत करू शकतील व एकल महिलाना नोंदणीसाठी app द्वारे आवाहन करता येईल. त्यामुळे हा कमी खर्चात होणारा सर्व्हे आहे.

आज आपल्या आजुबाजूला असलेल्या या लाखो भगिनी असूनही लक्षात येत नाहीत... अदृश्य असलेला हा प्रश्न संख्या पुढे आली की दुष्यमान होईल व सरकार व समाज यांच्यासाठी नक्कीच काही करू शकेल. त्यामुळे अहिल्यादेवी यांच्या ३०० व्या जयंती निमित्त एकल महिलांच्या प्रश्नावर सर्वेक्षणाची घोषणा सरकारने करून कृति कार्यक्रम जाहीर करावा अशी मागणी साऊ एकल महिला समितीचे संघटक रवि सातपुते (मो. ९३७११४०९१२) यांनी केली आहे.




# जामखेड तालुक्यातील चौंडी येथील वाहतूक मार्गात बदल

नगर - जामखेड तालुक्यातील चौंडी येथे ६ मे रोजी महाराष्ट्र शासनाच्या मंत्री परीषदेचे आयोजन नियोजीत असुन त्या बैठकी करता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, तसेच राज्यातील सर्व मंत्री, खासदार, आमदार आदी उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे तेथे मोठ्या प्रमाणात वाहनांची व नागरीकांची गर्दी होणार आहे. त्यामुळे वाहतुकीची कोंडी होऊन कोणत्याही प्रकारचा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू नये, याकरीता ६ एप्रिल रोजी रात्री १२ ते रात्री ८ वाजेपर्यत चौंडी गावातून जाणारे रोडवरील वाहतुकीचे नियमन केलेले असून, वाहतुकीच्या मार्गामध्ये खालीलप्रमाणे बदल केलेले आहे.

**हाळगाव - चौंडी मार्ग - चापडगावकडे जाणाऱ्या वाहनांकरीता वाहतुकीचा मार्ग**

हळगाव, पिंपरखेड गिरवली (ता.जामखेड), मलठण (ता. कर्जत) मार्गे चापडगाव असा राहील.

पिंपरखेड, चौंडी मार्गे चापडगावकडे जाणाऱ्या वाहनांकरीता वाहतुकीचा मार्ग. पिंपरखेड गिरवली, मलठण (ता. कर्जत) मार्गे निमगाव डाकू चापडगाव असा राहील.

**गिरवली - चौंडी मार्गे चापडगावकडे जाणाऱ्या वाहनांकरीता वाहतुकीचा मार्ग**

गिरवली (ता.जामखेड) मलठण (ता.कर्जत) मार्गे निमगाव डाकू चापडगाव असा राहील.

चापडगाव (ता. कर्जत) चौंडी मार्गे गिरवली जामखेडकडे जाणाऱ्या वाहनांकरीता वाहतुकीचा मार्ग

चापडगाव (ता.कर्जत) निमगाव डाकु मलठण (ता. कर्जत) गिरवली (ता. जामखेड) जामखेड असा राहील.

हा आदेश शासकीय वाहने, ॲम्ब्युलन्स, फायर ब्रिगेड, मंत्री परीषदेकरीता येणारी वाहने व स्थानिक प्रशासनाने अत्यावश्यक कारणास्तव परवानगी दिलेल्या वाहनांना लागु राहणार नाही.

या आदेशाचे पालन करुन नागरीकांनी पोलीस प्रशासनास सहकार्य करावे असे आवाहन पोलिस अधीक्षक अ.नगर) यांनी केले आहे

## डॉ. विजय खन्ना यांचे अल्प आजाराने निधन



नगर - तारकपूर येथील रहिवासी डॉ. विजय विलायतीराम खन्ना (वय ६७) यांचे ३ मे रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे १ पुतण्या सौरभ खन्ना व पुतणी स्नेहा दुवा असा परिवार आहे.

## दत्तात्रय शिंदे यांचे दु:खद निधन



नगर - येथील दत्तात्रय विश्वनाथ शिंदे (वय ७०) यांचे ४ मे रोजी निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. महापालिकेतील कर्मचारी महेश शिंदे यांचे ते वडील होत.

त्यांच्या मागे २ मुले, १ मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

## आनंद बुंदेले यांचे हृदयविकाराने निधन

नगर - जुने तालुका पोलीस स्टेशन परिसरातील पतंग विक्रेते आनंद विठ्ठल बुंदेले (वय ५०) यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, १ विवाहित व २ अविवाहित मुली आणि १ मुलगा आणि मोठे भाऊ असा परिवार आहे.



राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे प्रदेश उपाध्यक्ष राजेंद्र बुंदेले यांचे ते लहान बंधू होत. त्यांच्या आकस्मिक निधनाने परिसरात सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

## चंद्रकांत म्हस्के यांचे वृद्धापकाळाने निधन

नगर - निंबोडी (ता.पाथर्डी) येथील रहिवासी अ.नगर जिल्हा सहकारी बँकेचे माजी व्हा.चेअरमन व संचालक तसेच वृद्धेश्वर साखर कारखान्याचे संचालक तसेच जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे सदस्य चंद्रकांत गणपतराव म्हस्के (वय ८६) यांचे २ मे रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर निंबोडी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. पाथर्डी विधानसभा मतदारसंघाचे आमदार स्व. रावसाहेब म्हस्के यांचे ते चिरंजीव होत. त्यांच्यामागे २ मुले, १ मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे.



## प्रदीप (पॅडी) गायकवाड यांचे अल्प आजाराने निधन



श्रीरामपूर - शहरातील आशिर्वादनगर, वॉर्ड नं. १ येथे पूर्वी वास्तव्यास असलेले, सध्या यमुनानगर, सायखेडा फाटयाजवळ, नाशिक येथे वास्तव्यास असलेले उत्कृष्ट ऑक्टोपॅड वादक कलाकार प्रदीप (पॅडी) गायकवाड (वय ४९) यांचे ४ मे रोजी अल्पशः आजाराने निधन झाले.

## सगुणाबाई सोनवणे यांचे अल्पश: आजाराने निधन

श्रीरामपूर - येथील सगुणाबाई रघुनाथ सोनवणे (वय ८०) यांचे अल्पश: आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे. इलेक्ट्रिकल व्यावसायिक अशोक सोनवणे, सोनवणे क्लासेसचे संचालक प्रा.सुभाष सोनवणे व सौ.सुरेखा अरुण शेलार यांच्या मातोश्री, चि.मयूर, गणेश व विनायक सोनवणे यांच्या आजी होत.



## दरेवाडी येथे गळफास घेऊन एकाची आत्महत्या

नगर - राहत्या घरामध्ये घराच्या पत्र्याच्या छताच्या लोखंडी पाईपला ओढणीचे सहाय्याने गळफास घेऊन संतोष शिवाजी कुसळकर, (वय ३२, रा. दरेवाडी) यांनी आत्महत्या केली. ही घटना ३ एप्रिल रोजी दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास नगर सोलापूर रोडवरील दरेवाडी येथे घडली.

संतोष कुसाळकर यांनी गळफास घेतल्याचे निदर्शनास येताच त्यांना बेशुद्धावस्थेत विलास प्रकाश कुसळकर (रा. सागेळा बद्दी, ता.नगर) यांनी सिव्हिल हॉस्पिटल येथे दाखल केले असता डॉक्टरांनी त्यांना तपासून ते औषधोपचारापुर्वीच मयत झाले असल्याचे घोषीत केले.

या प्रकरणी सिव्हील हॉस्पीटलचे वैद्यकीय अधिकारी डॉ. सचिन शिंदे यांनी दिलेल्या माहितीनुसार भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात बी एन एस एस १९४ प्रमाणे अकस्मात मृत्यूची नोंद केली. पुढील तपास पोलिस हवालदार एम.टी. विधाते करीत आहेत.

## बलराम नंदाल यांचे हृदयविकाराने निधन



नगर - पाईपलाईन रोडवरील सिमला कॉलनीतील रहिवासी बलराम बालय्या नंदाल (वय ५७) यांचे ४ मे रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे १ मुलगा, मुलगी, सुन, जावई असा परिवार आहे. बालाजी नंदाल यांचे ते वडील होत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.



नगर-कल्याण महामार्गावरील नेप्ती नाका येथील सीना नदीवरील पुलाचे रखडलेले काम छायाचित्रात दिसत आहे. (छाया - लहू दळवी)

# सीना नदीवरील पुलाचे काम रखडले

(पान १ वरुन)

ज्या ठेकेदार संस्थेने सदर काम घेतले त्यास या कामासाठी दीड वर्षांची मुदत देण्यात आली होती. मात्र या मुदतीत हे काम पूर्ण होऊ शकलेले नाही. सध्याची कामाची गती पाहता या वर्षीच्या पावसाळ्यापूर्वी सदर पूल वाहतुकीसाठी खुला होईल की नाही, याबाबत साशंकता आहे.

### नवीन पुलाच्या कामाला गती देण्याची होतेय मागणी

कल्याण-नांदेड- निर्मल राष्ट्रीय महामार्ग नगर शहरातून जातो. शहरात नेप्ती नाका येथून हा महामार्ग अमरधाममार्गे भिंगारकडे जातो. अवजड वाहने बाह्यवळण रस्त्याने जात असली तरी प्रवासी वाहने याच मार्गाने शहरात येतात. नेप्ती नाक्याहून अमरधामकडे येणाऱ्या रस्त्यावर सीना नदी आहे. या सीना नदीवर एकेरी वाहतूक जाईल, असा पूल असून, तो ३० ते ३५ वर्षे जुना आहे. अनेकदा पावसाळ्यात सीना नदीला पूर आल्यानंतर या पुलावरून पाणी वाहते. त्यामुळे अनेकदा प्रशासनाला वाहतुकीसाठी हा पूल बंद करावा लागतो.

पुलाच्या पलीकडे असणाऱ्या शिवाजीनगरसह कल्याण रोड भागातील नागरिकांचा पूल बंद असल्याने नगर शहराशी संपर्क तुटतो. त्यामुळे या भागातील नागरिकांना केडगावमार्गे नगर शहरात दाखल व्हावे लागते. शिवाय अनेकदा नेप्ती नाका ते अमरधाम परिसरात वाहतूक कोंडीदेखील होते. त्यामुळे या कोंडीतून वाहनचालकांना मार्ग काढणे कठीण जाते. नव्या पुलाचे काम पूर्ण झाल्यावरच या सर्व समस्यांमधून नागरिकांची तसेच वाहनचालकांची सुटका होणार असल्याने या पुलाच्या कामाला गती देण्याची मागणी होत आहे.

# बेशुद्धावस्थेत आढळलेल्या ४५ वर्षीय इसमाचा मृत्यू; ओळख पटवण्याचे नागरिकांना आवाहन

नगर - नगर कल्याण रोड लगत शिवनेरी हाईटस जवळ झाडाखाली बेशुद्धावस्थेत मिळुन आल्याने त्यास खाजगी ॲम्ब्युलन्स चालक अक्षय पाचरणे याने उपचाराकरीता सिव्हील हॉस्पीटल येथे दाखल केले असता तो औषधोपचारापुर्वीच मयत झाला आहे. ही घटना २ मे रोजी घडली.

या प्रकरणी सिव्हील हॉस्पीटलचे वैद्यकीय अधिकारी डॉ. शिंदे यांनी दिलेल्या माहितीनुसार कोतवाली पोलीस ठाण्यात बी एन एस एस १९४ प्रमाणे अकस्मात मृत्यूची नोंद केली. अधिक तपास पोलिस हवालदार शरद वाघ हे करीत आहेत.

मृताची अद्याप ओळख पटली नसून पोलीस त्याची ओळख पटवण्याचा, तसेच त्याच्या नातेवाईकांचा शोध घेण्याचा प्रयत्न करीत आहे.

**मृत व्यक्तीचे वर्णन असे**

अनोळखी इसम, वय अंदाजे ४५ वर्षे, उंची १७० से.मी. रंग सावळा, नाक सरळ, दाढी मिशा बारीक, शरीरबांधा मध्यम, असे आहे. या इसमास कोणी ओळखत असेल अगर त्याच्याबाबत कोणाला काही माहिती असेल त्यांनी कोतवाली पोलीस ठाणे फोन नंबर ०२४१ २४ १६ ११७ या फोनवर संपर्क करा असे आवाहन कोतवाली पोलिसांनी केले आहे.

# चितळे रस्ता, चौपाटी कारंजा येथील पथविक्रेते आणि हातगाडी विक्रेत्यांचे महानगरपालिकेकडून स्थलांतर





नगर - शहराच्या मध्यवर्ती भागात दिवसेंदिवस रहदारी वाढत आहे. अशात दिल्लीगेट वेस ते चौपाटी कारंजा व तेथून चितळे रस्त्यावर अतिक्रमणांमुळे दररोज वाहतूक कोंडी होत होती. आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी तेथील अतिक्रमणधारक पथविक्रेते, हातगाडी विक्रेत्यांना मानकर गल्ली पटांगणात बसण्यासाठी जागा उपलब्ध करून दिली आहे.

दिल्लीगेट वेस, चौपाटी कारंजा व चितळे रस्ता हा कायम रहदारीचा रस्ता असून अतिक्रमणांमुळे या ठिकाणी सतत वाहतूक कोंडी होत होती. अनेक वर्षांपासून हा प्रश्न कायम होता. अतिक्रमणांवर कायमस्वरूपी तोडगा निघत नसल्याने नागरिकांना, वाहनचालकांना सातत्याने त्रासाला सामोरे जावे लागत होते. यशवंत डांगे यांनी या प्रकरणात लक्ष घालून तेथील अतिक्रमणधारक विक्रेत्यांना जवळच असलेल्या मानकर गल्ली पटांगणात बसण्यासाठी जागा उपलब्ध करून दिली. सकाळी व सायंकाळी अशा दोन सत्रात तात्पुरत्या स्वरूपात ही जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

दरम्यान, महानगरपालिका नेहरू मार्केटच्या जागेत भाजी मंडईसह व्यापारी संकुल उभारत आहे. त्यासाठी निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे. या माध्यमातून चितळे रस्त्यावर बसणाऱ्या भाजी विक्रेत्यांना बसण्यासाठी जागा उपलब्ध होणार आहे. त्यामुळे येत्या काळात चितळे रस्त्यावरील अतिक्रमणांचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लागणार असल्याचे यशवंत डांगे यांनी सांगितले.

दरम्यान, ज्यांना जागा उपलब्ध करून दिली आहे, त्यांनी रस्त्यावर व्यवसाय केल्यास, महानगरपालिका कठोर कारवाई करेल, असा इशारा यशवंत डांगे यांनी दिला आहे.



# गृहिणी

## आरोग्य

### रक्तातील साखरेचा करा नाश

काही फळे आणि भाज्या आरोग्यासाठी रामबाण उपाय म्हणून काम करतात त्याचप्रमाणे काही झाडांची पाने देखील औषधी गुणधर्मांनी परिपूर्ण असतात. आंब्याची पाने आरोग्यासाठी खूप फायदेशीर मानली जातात. दररोज सकाळी रिकाम्या पोटी आंब्याच्या पानांचे पाणी पिल्याने शरीराची इन्सुलिन संवेदनशीलता सुधारते, ज्यामुळे साखरेची पातळी नियंत्रणात राहते. हे चयापचय गतिमान करते आणि शरीरातील चरबी कमी करण्यास मदत करते. फॅटी लिव्हर, लठ्ठपणा आणि उच्च कॉलेस्ट्रॉल सारख्या समस्यांमध्ये देखील हे फायदेशीर आहे. आंब्याच्या पानांमध्ये असलेले टॅनिन आणि अँथोसायनिन रक्तातील साखर नियंत्रित करण्यास मदत करतात. हे इन्सुलिनची पातळी संतुलित करण्यास मदत करते. त्याचप्रमाणे आंब्याच्या अँटीऑक्सिडंटस् आणि व्हिटॅमिन ए हृदय व डोळ्यांचे आरोग्य सुधारते.

## पाककला

### मुगदाळ पॅनकेक

**साहित्य :** १ वाटी मूग डाळ, १/२ वाटी तांदळाचे पीठ, २ ते तीन टेबलस्पून बारीक रवा, २ हिरव्या मिरच्या, कोथिंबीर, ७ ते आठ लसूण पाकळ्या, १/२ इंच आले, तेल, एका गाजराचा कीस, १ बारीक चिरलेला कांदा

**कृती :** सर्वप्रथम मुगडाळ स्वच्छ धुऊन एक दोन तास भिजत ठेवावे त्यानंतर त्यातले पाणी काढून मिक्सरच्या भांड्यात मूग डाळ घ्यावी त्यातच हिरव्या मिरचीचे तुकडे, कोथंबीर, लसूण पाकळ्या, आले तांदळाचे पीठ आणि रवा घालून मिक्सरला बारीक वाटून घ्यावे बारीक वाटणे करता थोडेसे पाणी घालावे. डोशाचे बॅटर प्रमाणे बॅटर असावे. तयार बॅटर पंधरा मिनिट तसेच झाकून ठेवावे. आता तयार बॅटरमध्ये किसलेले गाजर घालावे आवडत असल्यास बारीक चिरलेला कांदा घालावा चवी नुसार मीठ घालावे आणि पुन्हा एकदा सर्व मिश्रण चांगले मिक्स करून घ्यावे. आता तवा गरम करून घ्यावा आणि त्याला तेलाचा बोळा पुसून घ्यावा आणि मुगाचे पॅन केक कसे मिश्रण ओतून घ्यावे पॅन केक दोन्ही बाजूने छान खरपूस भाजून घ्यावेत पुदिन्याची चटणी किंवा खोबऱ्याची चटणी तसेच शेजवान चटणी किंवा एखाद्या डीप सोबत हे पॅनकेक खाण्यास द्यावे.

## वास्तू

### हळदी मिश्रीत पाणी

* तुळशीच्या झाडावर हळदीचे पाणी अर्पण करणे अत्यंत शुभ मानले जाते. तुळस ही देवी लक्ष्मीचे तर हळद हे भगवान विष्णूचे प्रतिक आहे. या दोघांच्या संयोजनामुळे घरात लक्ष्मी आणि विष्णूचे एकत्रित आशिर्वाद येतात. ज्यामुळे संपत्ती आणि समृद्धी वाढते.

* हळद गुरू ग्रहाशी संबंधित आहे, जो ज्ञान, समृद्धी आणि भाग्याचा कारक आहे. तुळशीमध्ये हळदीचे पाणी ओतल्याने गुरू ग्रह बळकट होतो. मात्र तुळशीच्या झाडाला जास्त पाणी देऊ नये. याने तुळशीचे रोप कुजून सुकते जे चांगले लक्षण नाही.

## सल्ला

* खसखस मिक्सरमध्ये वाटायची असेल तर ती आधी पंधरा मिनीटे पाण्यात भिजत ठेवा.

* दह्यामध्ये कोणतेही मसाले अथवा मीठ मिसळणार असाल तर ते नीट घुसळून घ्यावे.

## सौंदर्य

चेहऱ्यावर लोणी लावल्याने त्वचा मऊ होते. दररोज रात्री झोपण्यापूर्वी चेहऱ्याला लोणी लावल्याने तुम्ही टॅनिनच्या समस्येपासून सहज सुटका मिळवू शकता.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

मंगळवार, दि. ६ मे २०२५

**---, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, वैशाख शुक्लपक्ष, मघा १५|५२, सूर्योदय ०६ वा. ३३ मि. सूर्यास्त ०५ वा. ३८ मि.**

## राशिभविष्य

**मेष :** आपल्या कुटुंबात बऱ्याच काळापासून चालणारा एखादा वादाचा विषय डोके वर काढेल.

**वृषभ :** व्यापारात आपल्या सेवेच्या मोबदल्यात योग्य लाभ मिळेल. आजचा दिवस महत्वपूर्ण ठरेल. व्यापार-व्यवसायात देवाण-घेवाण टाळा.

**मिथुन :** आज व्यावसायिक गुंतवणूक कराल. आपल्या आर्थिक स्थितीचा पाठपुरावा ही होईल.

**कर्क :** आज काही गोष्टी आकस्मिकरीत्या आनंद आणतील. आपल्या नवीन आवडींना प्रोत्साहन द्याल.

**सिंह :** जीवनात आलेल्या चांगल्या बदलांचा आनंद घ्याल. दिवस आनंदात जाईल. त्यामुळे घरात उत्साहाचे वातावरण राहिल. कौटुंबिक वेळ अनुकूल राहील.

**कन्या :** मानसन्मानात वाढ होईल. कामात एखाद्याचे सहकार्य प्रगतीचे कारण बनेल. काही अडकलेली कामे सहजरित्या होतील.

**तूळ :** आर्थिक विषयांमध्ये थोड्या अडचणी येऊ शकतात. करीयरसंदर्भातील नवी संधी मिळण्याची शक्यता.

**वृश्चिक :** आजचा दिवस आपणास पैसे मिळवण्याच्या आणि व्यापाराच्या नव्या संधी देईल परंतु घाई करणे अडचणीत टाकू शकते.

**धनु :** रहाते घर बदलण्यासाठी आजचा दिवस उत्तम आहे. राजकीय व्यक्तींसाठी स्थिती संतोषजनक राहील. आर्थिक लाभ होईल.

**मकर :** प्रिय व्यक्ती त्याच्या मनातील इच्छा पूर्ण करण्यासाठी आपल्यावर त्रागा करेल.

**कुंभ :** घरगुती बाबतीत दिवस आनंदात जाईल. आर्थिक बाबतीत काळ अनुकूल आहे. आपली मते खरी ठरतील.

**मीन :** सामाजिक कार्यांमध्ये सहयोग द्याल व मान-सन्मान वाढेल. मुले त्रास देऊ शकतात. अनावश्यक चिंता निर्माण होतील. उधारी वसुल होईल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## शब्दगंध क्र. ७१७० सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | ■ | ५ | ६ |
| ७ | | ■ | ८ | | ९ | ■ | |
| १० | | ११ | | ■ | १२ | १३ | |
| | ■ | | ■ | १४ | | | ■ |
| ■ | १५ | | ■ | १६ | | ■ | १७ |
| १८ | | | ■ | १९ | | २० | |
| | ■ | २१ | २२ | ■ | ■ | | ■ |
| २३ | | ■ | | ■ | २४ | | |

**आडवे शब्द :-** १) एक माजी केंद्रीय अर्थमंत्री ५) जनावर ज्याला बांधतात ती जमिनीत मारलेली खुंटी ७) मस्ती; जोर; पांघरण्याचे एक जाड व उबदार वस्त्र ८) ढग; घन; मेघ १०) जेवणातील एक आवश्यक घटक १२) न्हाव्याचे एक वस्त्र १४) बांगड्या भरणारा व विकणारा १५) पिकांवर पडणारा एक रोग; खवा १६) खांबांवर टाकलेली आडवी तुळई १८) तोंड; वदन १९) वारीला जाणारा २१) ध्यान; शंभर हजार, लाख २३) यजन; याग; मख २४) एक वृक्ष; औदुंबर

**उभे शब्द :-** १) दीर्घकाळपर्यंत २) जमावाने केलेली जाळपोळ, दगडफेक, हाणामारी वगैरे प्रकार ३) उपभोक्ता; पती ४) घाण; विष्ठा ६) घोड्याला खाजविण्याचे साधन ९) प्रपंचरूपी समुद्र ११) समुद्रात लागलेला अग्नी १३) दर्जा; थर; पापुद्रा १४) पाट; नहर १५) गळ्याची मागची बाजू; आदर १७) घरातील सांडपाणी काढून देण्याची वाट १८) घर; खाण; साठा; गोदाम २०) एक मांसाहारी खाद्यपदार्थ २२) घटिकेचा साठावा भाग; पळ

### शब्दगंध क्र. ७१६९ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| नं | द | न | व | न | ■ | खे | र |
| दी | र | ■ | ■ | मा | व | ळ | सी |
| ■ | व | न | रा | ज | ■ | ब्रं | ■ |
| ज | ळ | गा | व | ■ | सं | डो | ल |
| त | ■ | रा | ■ | ■ | द | बा | व |
| रा | कं | ■ | जी | व | न | ■ | क |
| रं | ■ | क | व | च | ■ | घो | र |
| ग | वा | क्ष | ■ | क | ला | स | ■ |

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार :** जीवनात परिस्थिती नावाची शाळा माणसाला सुयोग्य शिक्षण देते.

## मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

### पहिले सिनेमागृह कोठे उभारले गेले?

१८९५ मध्ये पॅरिस, फ्रान्समध्ये पहिला सिनेमागृह ऑगस्टे आणि लुई लुमियर या लुमियर बंधूंनी बांधले. २८ डिसेंबर १८९५ रोजी पॅरिसमधील ग्रँड कॅफेमध्ये प्रदर्शित झालेल्या चित्रपटाचे नाव सिनेमॅटोग्राफ होते. लुमियर भावंडांनी त्यांच्या नाविन्यपूर्ण सिनेमॅटोग्राफीचा वापर करून प्रेक्षकांसाठी लघुपट पडद्यावर प्रदर्शित केले आणि त्यामुळे हा पहिला सार्वजनिक चित्रपट बनला. जर मूळ सिनेमा आजही अस्तित्वात असता तर तो एखाद्या संग्रहालयात किंवा ऐतिहासिक स्थळी असण्याची शक्यता आहे. ज्या फॅब्युलस बिस्ट्रोमध्ये तो प्रदर्शित झाला होता तो अजूनही अस्तित्वात आहे आणि अजूनही कॅफे म्हणून काम करत आहे, त्यामुळे पहिल्या चित्रपटाचे रचनेच्या अनुभवांच्या संचाचे वैशिष्ट्य म्हणून संरक्षण केले गेले असावे अशी शक्यता आहे. तथापि, हे देखील शक्य आहे की मूळ सिनेमा त्याच्या वयामुळे, तसेच त्याच्या बांधकामापासून तंत्रज्ञान आणि बिल्डिंग कोडमधील प्रगतीमुळे कालांतराने पाडला गेला असेल किंवा लक्षणीयरीत्या बदलला गेला असेल.

## कृतघ्नता

एकदा एका धनगराला वाटले आपल्या मेंढ्यांना 'बाभळीच्या शेंगा खाऊ घालाव्यात'. म्हणून तो आपले धोतर झाडाखाली ठेवून, झाडावरून शेंगा आणि पाला खाली टाकू लागला.

ते खात असताना त्यातील काही मेंढ्या त्याचे धोतरही खाऊ लागल्या. ते पाहून वरून धनगर म्हणाला,

'अरे, इतरांना तुम्ही कपड्यांसाठी तुमची लोकर देता पण मी जो तुमचा मालक त्याचे धोतर मात्र तुम्ही खाऊन टाकता? हा किती कृतघ्नपणा!''

तात्पर्य : भुकेच्या वेळी आपण काय करतो आहोत याची शुद्ध प्राणीमात्रांना रहात नाही.

## रहमते दर्शन (भाग - १)



मेरे वापिस आने पर नसीब ने मुझे बताया कि कुछ दिन पहले उसकी दाई टाँग में बेहद दर्द होने लगा और उसने सोचा कि वो यमुना पार अपने एक रिश्तेदार के घर चली जाये। उसे महाराज जी ने फ़रमाया, मुझे भी उस तरफ जाना है, आप मेरे साथ चलो, वहाँ से आप को मेरा ड्राइवर छोड़ आयेगा। दर्द की वजह से वो चाहती थी कि वो बस द्वारा ही चली जाये और महाराज जी का इंतजार नहीं करे। महाराज जी ने फिर थोड़ा इंतज़ार करने को और उनके साथ ही चलने को कहा। इसी कशमकश में शाम हो गई। नसीब सोचने

लगी, अब देर हो गई है, मैं नहीं जाऊँगी। महाराज जी, माता जी और गिल ड्राइवर कार के पास पहुँच गये और नसीब को भी बुलाया । नसीब ने कहा, भापा जी, अब मैं नहीं जाऊँगी। हुजूर ने उसका बाजू पकड़ा और उसे खींच कर कार में बिठा लिया। सर्दी का मौसम था। कोई गर्म कपड़ा साथ लिए बग़ैर वो महाराज जी के साथ चल पड़ी।

कार सीधी सरदार मनोहरसिंह दुग्गल के घर पहुँची। सब ऊपर चले गये और कमरे में पहुँचें ही

### उन्होंने अपनी रहमत से मुझे बुलाया

थे कि श्रीमती मनोहरसिंह ने भजन कौर का नाम लेकर कहा कि रज़ाई लाओ, मिसेज तेजी की टाँग में बहुत दर्द है । नसीब गुस्से में सोचने लगी, आये बड़े अन्तर्यामी, किसी ने बता दिया होगा कि मुझे तकलीफ़ है । महाराज जी ने सब को इशारा कर के कमरे से बाहर निकाल दिया और रज़ाई देकर नसीब से महाराज जी कहने लगे, बहन जी, रज़ाई चारों तरफ लपेट लो और भजन पर बैठ जाओ। आँखें बंद कर लो।

नसीब को और गुस्सा आया कि मुझे तो दर्द हो रहा है और ये मुझे भजन पर बिठा रहे हैं तो हुजूर फ़रमाने लगे, मन को काबू में रखो, और बिजली और दरवाजा बंद करके खुद भी बाहर चले गये। अब कमरे में नसीब ने देखा कि संत कृपालसिंह जी महाराज और दर्शनसिंह जी महाराज प्रकट हुए। और संत कृपालसिंह जी महाराज, दर्शनसिंह जी महाराज के शरीर में समाने लगे और कभी दर्शनसिंह जी महाराज, हुजूरे पुरनूर में समाने लगे। हुजूर संत कृपालसिंह जी महाराज ने नसीब से फ़रमाया, आपको यकीन नहीं आया कि मैं इनके शरीर में काम कर रहा हूँ? नसीब का शरीर काँपने लगा और हुजूरे पुरनूर के हुक्म सामने हाथ जोड़े ही थे कि दर्शनसिंह जी महाराज फिर से कमरे में आ गये और बिजली जला दी। वह कान पकड़ कर उनसे कहने लगी, महाराज जी, मैं तो पागल हूँ, मुझे माफ़ कर दो और ये महाराज कृपालसिंह जी खड़े है, इनके दर्शन करो। अब महाराज जी ज़ोर से बोले, ख़बरदार, जो मुझे महाराज जी कहा, मुझे हमेशा की तरह भाषा जी कह कर बुलाना है। अब तो मेरी मर्ज़ी है, मैं जो चाहे कहूँ क्योंकि मैंने अपनी आँखों से देख लिया है। इस तरह नसीब के मन का भ्रम निकाल कर महाराज जी ने मियाँ-बीवी को एक ही रास्ते पर चला दिया और उनकी रहमत की बातें घर में होने लगीं और ज़िन्दगी फिर से खुशी से व्यतीत होने लगी।

पट्टी आने का नज़ारा

दयाल पुरुष संत दर्शनसिंह जी महाराज ने पंजाब का सिर्फ एक ही दौरा किया। अपने दिये हुए वचनों के मुताबिक अपने दौरे के आख़िरी पड़ाव में १९ दिसम्बर, १९७८ की आधी रात को महाराज जी हमारे घर पहुँचे।

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

गम्भीर रोग होने पर १ घंटा इस चक्र पर ध्यान लगाना चाहिये। इस केन्द्र पर बिंदू के रुप में प्रकाश देखे और मन में दोहराते रहें आप शांत स्वरूप हो शांत स्वरूप हो। चिड़चिड़ापन आना अर्थात यह चक्र कमजोर हो गया है। आप जो स्थूल भोजन ले रहें हैं उस में परिवर्तन करो। आप के आसपास के वातावरण में कमजोर आत्मायें आ गई हैं। आप ने पढ़ना बंद कर दिया है। ये सब ठीक करो तथा मणिपुर चक्र पर ध्यान लगाने से ये मनोदशा भी ठीक हो जाती है। इस चक्र के जागृत होते ही व्यक्ति को प्रकृति का पूर्ण ज्ञान प्राप्त होता है। पिछले जन्मों का ज्ञान और अग्नि तत्व में सिद्धि प्राप्त हो सकती है। इस चक्र पर ध्यान लगाने से रक्त एवम रस आदि पूरे शरीर के विभिन्न अवयवों को समान रुप से मिलता है। इस चक्र पर गहरा ध्यान लगाने से आनंद आने लगता है और वीणा जैसी धुन सुनाई देती है। क्योंकि ये चक्र सूर्य से जुड़ा हुआ है इसलिये योगी वा जिन लोगों की ध्यान में दिलचस्पी नहीं है वह लोग हरी पत्तेदार सब्जियां ज्यादा खाया करें और सूर्य या शिव के बिन्दू रूप पर ध्यान लगाना है।

यह चक्र शरीर में नाभि से हृदय तक मौजूद है। भोजन से बना रस सारे शरीर को पहुंचता हैं।

### स्वाधिष्ठान चक्र

इस चक्र में दस पखुड़ियां होती हैं।

इसे ज्ञान चक्र भी कहते हैं। कानों से सुने शब्द, स्पर्श, जीभ और नाक इन्द्रिय से प्राप्त ज्ञान इस चक्र में आता है।

इस चक्र का पीला रंग होता है।

सक्रियता

नीबू तथा सिट्रोनेला (Citronella) तेल को विशिष्ट जगह, रीढ़ के मनको पर लगाने पर मणिपुर चक्र सक्रिय होता है। उर्जावान गतिविधियों नाचना, खेल व्यायाम आदि के माध्यम से भी इस चक्र को जागृत किया जा सकता है। यह ज्ञान का केन्द्र है। इसे जागृत करने के लिए हर रोज नया पढ़ना चाहिये। यह दस पंखुड़ियों वाला कमल है अर्थात् यहां १० नस नाड़ियां मिलती हैं जो शरीर को स्वस्थ बनाने की शक्ति देती है।

यह चक्र असंतुलित होने पर पाचन सम्बन्धी विकार, अर्जीण, मधुमेह, उच्च रक्तचाप, हायपागलासीमिया, अल्सर आदि रोग हो जाते हैं।

मणिपुर चक्र भावनायों का केन्द्र है। हमारे बारे में जो कोई बुरे भाव रखता है, या हम किसी के बारे भाव रखते हैं कि वह निकमा है, लालची है, नीच है, ये भावनाएं इस चक्र को दूषित कर देती हैं।

रोटी, कपड़ा, मकान, बिजनेस या सम्बंधों के कारण, व्यवहार के कारण जो मन में तनाव होता है, यह मणिपुर चक्र के दूषित होने के कारण होता है। तनाव के साथ गुस्सा व चिड़चिड़ापन भी है तो उस का कारण दूषित मणिपुर चक्र ही है।

ऊर्जा का केंद्र

सारे ब्रह्मांड को ऊर्जा सूर्य से मिलती है। सूर्य ब्रह्माण्ड का मध्य बिन्दू है। तना पेड़ का मध्य बिंदु है। तना जड़ से शक्ति ले कर पुरे पेड़ को भेजता है। यह चक्र शरीर का मध्य बिंदु है। हम जो कुछ खाते हैं पेट मैं जाता है। भोजन में जो विटामिन मिनरल या दुसरे तत्व होते हैं उन्हें शरीर के सभी अंगों तक यही चक्र भेजता है । हम जो दवाईयां आदि खाते हैं उन का सत्व भी यहीं से सम्बंधित अंगों व शरीर में जाता है। इसलिए सदा सात्विक और सब्तुलित भोजन खाना चाहिए। अगर भोजन संतुलित नहीं होगा तो शरीर को विटामिन्स नहीं मिलेंगे और रोग पनपने लगेंगे।

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

एका मुलीला पहायला पाहुणे आलेले असतात. बहीण किचनमध्ये असते. तिचा भाऊ किचनमध्ये गेल्यावर बहीण त्याला विचारले... **बहीण :** मुलगा कसा आहे? **भाऊ :** मुलगा चांगला आहे, इंजिनियर आहे, दिसायला फिल्मचा हिरो वाटतो **बहिण :** कुठल्या फिल्मचा हिरो **भाऊ :** फँड्री

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* 'समिती' हे नाव कोणत्या प्रकारचे नाम आहे?

– विशेषनाम

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आयुर्वेदीय बालसंस्कार

ही औषधी द्रव्ये सहाणेवर दुधासोबत उगाळून त्याची होणारी पेस्ट बाळाला चाटवावी. त्यासाठी मातेच्या दुधाचा किंवा गायीच्या दुधाचा वापर करावा. मातेचे किंवा गायीचे दध दोन-तीन चमचे घेऊन त्यात या औषधी द्रव्यांचे वेढे सहाणेवर उगाळून गुटी बनवावी.

औषधी द्रव्ये :

खारीक, बदाम, जायफळ, मायफळ, ज्येष्ठमध, हिरडा, बेहडा, बालहिरडा, मुरूडशेंग, अतिविषा, डिकामली चूर्ण, वेखंड, खडीसाखर. नमा

१. खारीक, बदाम- ही द्रव्ये धातुवर्धक, बल्य अशी आहेत, म्हणून बाळाचे वजन चांगले वाढावे, बाळ सुदृढ व्हावे, यासाठी याचा उपयोग होतो. खारीक व बदाम ही द्रव्ये चवीला गोड असल्याने त्याचे वेढे थोडे जास्त घ्यावेत.

२. जायफळ- हे दिसायला बेहड्यासारखे फळ असून, पांढरट रंगाचे असते. जेव्हा बाळाला जुलाब होतात, तेव्हा याच्या ग्राही गुणधर्मामुळे जुलाब थांबतात. तसेच याने बाळाला झोपदेखील शांत येते. गुटीमध्ये जायफळाचा वापर विचारपूर्वक करावा.

### आयुर्वेदिक बालगुटी

बाळाला जास्त झोप येत असेल, तर एखादाच वेढा घ्यावा. झोपेचे प्रमाण कमी असेल, तर दोन-तीन वेढे घ्यावेत. तसेच शी कडक होत असेल, तर याचे प्रमाण कमी ठेवावे व बाळाला जुलाब होत असतील, तर तेवढ्यापुरते प्रमाण वाढवावे.

३. मायफळ- हे बेहड्याच्या आकाराचे, पण छोटे, गोलसर फळ आहे. यावर काट्यासारखे छोटे छोटे फोड असतात. हे शीत गुणात्मक असल्याकारणाने बाळाला तोंड येणे, लघवी गरम होणे. अंग गरम लागणे अशा लक्षणांवर आपल्याला याचा वापर करता येतो. यामुळे बाळाची वाढदेखील चांगली होते, म्हणून नियमितपणे गुटीमध्ये याचा वापर करावा.

४. ज्येष्ठमध- ज्येष्ठमधाची काडी वरून तांबूस रंगाची व आतून पिवळसर असते. ज्येष्ठमधाची चव गोड असते. हे रक्तवर्धक, कंठसुधारक व बलकारक असे आहे. त्यामुळे बाळाचा खोकला थांबतो, आवाज चांगला होतो व रक्ताचे प्रमाणदेखील व्यवस्थित राहून बाळ सुदृढ होते, म्हणून याचा गुटीत वापर करावा.

५. हिरडा- हिरवट रंगाचा, दाट सुरकुत्या व वजनदार असा हा सुरवारी हिरडा असतो. हा रसायन औषधांमधील असल्या कारणाने बाळाची प्रतिकारशक्ती वाढविण्यासाठी याचा उपयोग होतो. ज्वरनाशक, रेचक असे याचे गुणधर्म आहेत. त्यामुळे बाळाला पोट साफ होण्यासाठी, तसेच ताप कमी करण्यासाठी याचा वापर करतात. बाळाला जुलाब होत असतील, तर तात्पुरते याचे वेढे थांबवावेत.

६. बेहडा -

हा भुरकट रंगाचा, गोल आकाराचा असतो. हे देखील एक रसायनऔषध आहे. बाळाची प्रतिकारशक्ती वाढविण्यासाठी याचा वापर करावा. उत्तम कफनाशक असल्याकारणाने सरदी, खोकला हे आजार बालकाला होत नाहीत.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांड्ळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००





नगरमध्ये आल्यावर महात्मा फुले चौकापासून श्री प्रविणऋषीजी म.सा.यांचे जल्लोषपुर्ण वातावरणात स्वागत करण्यात आले. शेजारील छायाचित्रात प्रवचन सोहळ्यामध्ये उपस्थित भाविक.

# नातेसंबंध दृढ करण्यासाठी नवकार महामंत्र हा प्रभावी उपाय

## श्री प्रविणऋषीजी म.सा.यांचे आवाहन

नगर - कुटूंबातील सर्वांनी एकमेकांसमोर बसून नवकार महामंत्राचा फक्त सात वेळा जप करत आपले नातेसंबंध दृढ करावेत. नातेसंबंध दृढ करण्यासाठी नवकार महामंत्र हा प्रभावी उपाय आहे, असे राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषिजी म.सा. यांचे परमशिष्य उपाध्याय श्री प्रविणऋषीजी म.सा.यांनी सांगितले.

चिचोंडी पाटील येथून नगरमध्ये आल्यावर महात्मा फुले चौकापासून श्री प्रविणऋषीजी म.सा.यांचे स्वागत जल्लोषपूर्ण वातावरणात करण्यात आले. सुमारे २०० महिलांनी एकाच रंगाच्या साड्या परिधान करून स्वागत गीत बरोबर स्वागत केले. आनंदधाममध्ये श्री प्रविणऋषीजी म.सा.यांचे आगमन होताच सर्वांचा उत्साह शिगेला पोहोचला.

श्री वर्धमान स्थानकवासी सकल जैन श्रीसंघाने आनंदधाममध्ये आयोजित केलेल्या प्रवचन सोहळ्यामध्ये सुरेश कांकरिया यांनी स्वागत केले. बाबुशेठ बोरा यांनी प्रविणऋषीजींचा चातुर्मास २०२६ मध्ये आनंदधाममध्ये होणार असल्याची माहिती दिली. ती ऐकताच उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात आनंद व्यक्त केला.

प्रविणऋषीजी पुढे म्हणाले, परिवारातील नातेसंबंध अधिक घट्ट रहाणे कुटूंबव्यवस्था टिकून राहण्यासाठी अत्यावश्यक ठरते. अलिकडे घरातले एकमेकांसमोर बसून मनमोकळ्या गप्पा मारताना दिसत नाहीत! गोठ्यात जनावरं एकमेकांजवळ असली तरी मौन पाळून असतात. माणसांनी मौन धरून घराचा गोठा केलाय. कुटूंबातील संवाद हरवत चाललाय. यामुळे नात्यांना कुष्ठरोग झालाय. घरात आपलेपणाने समजून घेणारे कोणी दिसत नसल्याने घराबाहेर समजून घेणारे कोणी आहे का? हे शोधण्याचा प्रयत्न सुरू होऊन नाते तुटण्यास प्रारंभ होतो.

आपल्या घरातील तक्रार कोणत्याही परिस्थितीत घराबाहेर कधीही करू नये. पती-पत्नीने आपल्यामधील भांडण कोणालाही सांगू नये. अगदी माहेरी आई-वडिलांनाही कळू देवू नये. घर म्हटले की एकमेकांच्या मनाविरूध्द काहीतरी घडत असतंच! घरात कोणीही नकारात्मक बोलायचे नाही असे ठरवून आपलेपणा जपत संवाद साधत रहावं. मतभेद आपोआप मिटतात, हे जाणवेल.

मुलींना आई जशी आपली वाटते तशी सासू आपलीच वाटली पाहिजे. आई कितीही प्रेम करणारी असली तरी स्वतःचे घरदार मुलीला देत नाही. आईची उत्तराधिकारी मुलीला होता येत नाही! सासूबाई मात्र आपला मुलगा आणि संपूर्ण घरदार सुनबाईच्या स्वाधिन करते. सासूबाईच्या उत्तराधिकारी होण्याचा मान सुनबाईंना सहजपणे मिळतो.

घरातल्यांचा आशीर्वाद ज्यांना मिळतो त्यांना काळसर्प पूजा करावी लागत नाही. घरातले आपले आहेत. बाहेरचे आपले कधीच होऊ शकत नाहीत, हे सत्य ध्यानी घ्या. घरातल्यांचे नाते जपा, असे आवाहन करताना प्रविणऋषीजींनी दिलेली विविध उदाहरणे उपस्थितांना चांगलीच भावली.

आदेश चंगेडिया यांनी आभार मानताना प्रविणऋषीजींनी २०२६ च्या चातुर्मासाचे निमंत्रण स्विकारले आहे. या शिखर चातुर्मासाचे मायक्रो प्लॅनिंग करण्यात येईल, असे सांगितले.

प्रवचन सोहळ्यास सर्व श्री सकल संघ उपस्थित होते. आयोजक - अशोक (बाबुशेठ) बोरा, आदेश चंगेडिया, राजेश भंडारी, सुनिल मुनोत, अनिल पोखरणा, प्रफुल्ल पारख, विलास कटारिया, सुरेश कांकरिया, संतोष शेटीया, सचिन देसरडा, अनिल कटारिया आदींसह शहरातील आणि उपनगरातील भाविक उपस्थित होते. महिलांची उपस्थिती लक्षणिय होती.

# लक्ष्मीबाई भाऊराव पाटील माध्यमिक विद्यालयास कर्मवीर पारितोषिक जाहीर

## संस्थेचे अध्यक्ष खा. शरद पवार यांच्या हस्ते सातारा येथे ९ मे रोजी होणार सन्मान



नगर - शहरातील रयत शिक्षण संस्थेच्या लक्ष्मीबाई भाऊराव पाटील माध्यमिक विद्यालयास संस्थेच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२४-२५ चे सर्वोत्कृष्ट कामगिरीच्या गौरवार्थ कर्मवीर पारितोषिक नुकतेच जाहीर झाले आहे.

रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या ६६ व्या पुण्यतिथी निमित्ताने ९ मे रोजी संस्थेचे अध्यक्ष तथा खासदार शरद पवार यांच्या हस्ते हे मानाचे पारितोषिक सातारा येथील कर्मवीर समाधी परिसरात होणाऱ्या कार्यक्रमात शाळेला सन्मानपूर्वक प्रदान करण्यात येणार आहे. संस्थेतील सर्वाधिक गुणवत्ता प्राप्त विद्यालयाचे पुनर्मूल्यांकन करून दिला जाणारा हा सर्वोच्च गुणवत्तेचा मानाचा पुरस्कार आहे.

सदर पारितोषिक मिळण्यामध्ये विद्यालयातील सर्व सेवक व विद्यार्थी यांचे योगदान आहे. विद्यालयात सर्व सेवकांना बरोबर घेऊन विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने पूर्णपणे प्रयत्न केला जातो. या विद्यालयाच्या गुणवत्ता विकासाच्या वाढीसाठी संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी आमदार दादाभाऊ कळमकर यांचे विशेष मार्गदर्शन मिळाले आहे. तसेच स्व. शंकरराव काळे यांचे या विद्यालयावर विशेष प्रेम होते. मागील कालखंडात त्यांचे विशेष योगदान या विद्यालयास मिळाल्याने विद्यालयास हे पारितोषिक प्राप्त झालेले आहे.

शाळेला पुरस्कार मिळाल्याबद्दल रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य तथा शाळा समितीचे अध्यक्ष दादाभाऊ कळमकर, संस्थेच्या उत्तर विभागीय सल्लागार मंडळाचे अध्यक्ष आमदार आशुतोष काळे, जनरल बॉडी सदस्य ज्ञानदेवराव पांडुळे, अर्जुनराव पोकळे, अभिषेक कळमकर, उत्तर विभागीय अधिकारी नवनाथ बोडखे, अंबादास गारुडकर, विश्वासराव काळे, कैलासराव मोहिते, विष्णुपंत म्हस्के, श्यामराव व्यवहारे यांनी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका छाया काकडे, प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा मार्गदर्शक शिवाजी लंके, विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर सेवक, विद्यार्थी यांचे अभिनंदन केले.



२०२१ २२ या वर्षाकरिता उत्कृष्ट खेळाडू पुरस्कार अ‍ॅड.श्रीनिवास शिवाजी कराळे यांना पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. (छाया - उदय जोशी)

# श्रीनिवास कराळे यांना उत्कृष्ट खेळाडू पुरस्कार प्रदान

नगर - पोलीस परेड ग्राउंड येथे महाराष्ट्र शासन आयोजित महाराष्ट्र दिन कार्यक्रमात अहिल्यानगर जिल्हा क्रीडा पुरस्कार प्रदान करण्यात आले. २०२१ २२ या वर्षाकरिता उत्कृष्ट खेळाडू पुरस्कार अ‍ॅड. श्रीनिवास शिवाजी कराळे यांना पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, पोलीस अधीक्षक राकेश ओला, मनपा आयुक्त यशवंत डांगे, जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरांगे, क्रीडा अधिकारी भाऊराव वीर यांच्या उपस्थितीत पुरस्कार प्रदान करण्यात आला.

# राज्यस्तरीय शैक्षणिक व्हिडिओ निर्मिती स्पर्धेत अर्चना बोरुडे प्रथम

नगर - राज्यस्तरीय शैक्षणिक व्हिडिओ निर्मिती स्पर्धा २०२३ चा निकाल नुकताच जाहीर झालेला आहे. त्यात जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जलशुद्धीकरण (विळद) येथील शिक्षिका अर्चना बोरुडे यांनी तालुकास्तरावरील दोन स्पर्धेत प्रथम व गणित गटात तृतीय क्रमांक तालुका मिळवून तालुक्यातून अव्वल स्थान मिळवले आहे.



राज्यस्तरीय शैक्षणिक व्हिडिओ निर्मिती स्पर्धेत अर्चना बोरुडे प्रथम पारितोषिक स्वीकारताना.

या स्पर्धेत गट १- इ. १ ते २ री, गट २- इ. ३ ते ५ वी, गट ३- इ. ६ ते ८ वी, गट ४ -९ ते १० वी, गट ५ - इ. ११ ते १२ वी, गट ६ - अध्यापक विद्यालय अशा एकूण सहा गटात विषय निहाय स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. अर्चना बोरुडे यांनी विविध गटात व्हिडिओ अपलोड करून स्पर्धेत सहभाग नोंदवला. त्यापैकी इ. ६ ते ८ इंग्रजी - प्रथम, इ. ९ ते १० इंग्रजी - प्रथम, इ. ३ ते ५ गणित - तृतीय क्रमांक मिळवला आहे.

तालुकास्तरावर दोन व्हिडिओला प्रथम क्रमांक व एका व्हिडिओला तृतीय क्रमांक प्राप्त झाले असून एकूण सात हजार पाचशे रुपये रोख बक्षिसाच्या त्या मानकरी ठरल्या.

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे आयोजीत शैक्षणिक व्हीडिओ निर्मिती स्पर्धेत अर्चना बोरुडे यांना प्रथम क्रमांकाचा पारितोषिक गटशिक्षणाधिकारी बाबुराव जाधव, विस्तार अधिकारी संजय बोबडे यांच्या हस्ते देण्यात आले. अर्चना बोरुडे यांना तंत्रज्ञानात पूर्वीपासूनच आवड असल्याने त्यांनी अनेक शैक्षणिक व्हिडिओ निर्मिती केलेले आहेत.

# प्रत्येक मतदारसंघात भेट देऊन आढावा बैठक घेऊन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पुन्हा बळकटीकरण करणार

## जिल्हा प्रभारी अशोक पवार यांचे प्रतिपादन, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची आढावा बैठक





राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने पक्ष कार्यालय राष्ट्रवादी भवन येथे पदाधिकारी आढावा बैठक घेण्यात आली.

नगर - राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षांमध्ये तरुण पिढीला काम करण्याची अधिक संधी आहे. मात्र राजकारणापासून लोक लांब जात आहेत. आगामी काळात जिल्ह्यातील सर्व तालुकानिहाय बैठका आयोजित करून तरुणांना पक्षासोबत जोडण्याचे आपण काम करून पक्ष बांधणी मजबूत करण्यासाठी प्रयत्न करणार आहे. संपूर्ण जिल्ह्याचा दौरा करून आढावा बैठक घेऊन पक्षाची ताकद वाढवणार व पक्षामध्ये आपापसातील मतभेद आहे ते संपून एक मताने व एक विचाराने सर्व जाती-धर्माच्या लोकाना पक्षासोबत जोडण्याचे काम करणार असल्याची भावना जिल्हा प्रभारी माजी आमदार अशोक पवार यांनी व्यक्त केली.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने पक्ष कार्यालय राष्ट्रवादी भवन येथे पदाधिकारी आढावा बैठक घेण्यात आली. यात जिल्हा प्रभारी माजी आमदार अशोक पवार, निरीक्षक अंकुश काकडे, खासदार निलेश लंके, जिल्हाध्यक्ष राजेंद्र फाळके, कार्याध्यक्ष संदीप वर्पे, माजी आमदार दादाभाऊ कळमकर, शहर जिल्हाध्यक्ष अभिषेक कळमकर, महिला जिल्हाध्यक्ष योगिता राजळे, रामेश्वर निमसे, सिताराम काकडे, सुरज मोरे, महेंद्र शेळके, विजयसिंह गोलेकर, अशोक बाबर, सुरेश गडाख, हरिदास शिर्के, जावेद शेख, बाबा तरटे, बाबा भिटे, शौकत तांबोळी, किसनराव लोटके, अथर खान, शिवशंकर राजळे, रघुनाथ काळदाते, मच्छिंद्र सोनवणे, प्रकाश पोटे, सतीश थोरात, सुधीर मस्के, विशाल म्हेत्रे, विनोद साळवे, फारूक रंगरेज, आरिफ पटेल आदींसह सर्व तालुकाध्यक्ष, शहराध्यक्ष, विधानसभा अध्यक्ष, फ्रंटल सेलचे प्रमुख, सर्व प्रदेश पदाधिकारी, जिल्हा पदाधिकारी उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना जिल्हाध्यक्ष राजेंद्र फाळके यांनी आपल्या प्रस्ताविकात म्हणाले की, निवडणुकीच्या काळात लाडक्या बहिणींच्या खात्यात पैसे पडले त्याच्या देखील निवडणुकांवर फरक झाला व नगर जिल्ह्यात लोकसभा व विधानसभेच्या निवडणुकीच्या पाच महिन्याच्या आतमध्ये १ लाख ३० हजार मतदान आले कुठून व वाढले कसे याला अनेक गोष्टी कारणीभूत आहे. शिव, शाहू, फुले, आंबेडकर चळवळीच्या विचारावर चालणारा पक्ष हा जातीयवादी पक्षाच्या नादी लागत नसून येणाऱ्या काळात मोठ्या प्रमाणात पक्ष बळकटीकरण करणार असल्याचे सांगितले.

खासदार लंके म्हणाले की, आपला जिल्हा शरदचंद्र पवार यांच्यावर प्रेम करणारा जिल्हा आहे व आपला कार्यकर्ता कितीही संकटात असला तरी त्याला ताकद देण्याची गरज आहे व येणाऱ्या काळात युवकांना मोठ्या प्रमाणात पक्षात काम करण्याची संधी भेटणार असून युवकांना पक्षांमध्ये मोठ्या प्रमाणात जोडणार असल्याची भावना व्यक्त केली.

निरीक्षक अंकुश काकडे म्हणाले की, पक्षाचे ध्येय धोरण तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी कुटीबद्ध राहून प्रत्येक कार्यकर्त्यांनी आपला पक्ष कसा वाढवता येणार यासाठी प्रयत्न करावे व पक्ष देखील कार्यकर्त्यांसाठी सदैव पाठीशी उभा राहणार असल्याचे सांगितले. जिल्ह्यातील प्रत्येक तालुकाध्यक्ष यांनी यापुढील अधिक सक्रीय काम करून पक्षसंघटना वाढीसाठी प्रयत्न करावे असे आवाहन काकडे यांनी केले.

तसेच सर्व तालुकाध्यक्ष, शहराध्यक्ष, प्रदेश पदाधिकाऱ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.



महर्षी ग.ज. चितांबर विद्या मंदिरमध्ये माजी विद्यार्थिनींचा स्नेहमेळावा आयोजित करण्यात आला होता.

# महर्षी ग.ज. चितांबर विद्या मंदिर मध्ये २००३-०४ बॅचचा माजी विद्यार्थी स्नेहमेळावा

नगर - येथील नव विद्या प्रसारक मंडळाच्या महर्षी ग.ज. चितांबर विद्या मंदिरमध्ये २००३ ते २००४ या वर्षांतील विद्यालयाच्या माजी विद्यार्थिनींचा स्नेह मेळावा नुकताच आयोजित करण्यात आला होता. आपले शालेय व महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण करून व्यावसायिक व कौटुंबिक जीवनात स्थिरता लाभल्यानंतरही अनेक विद्यार्थ्यांना आपल्या शाळेची ओढ स्वस्थ बसू देत नाही. शालेय वयातील मित्र-मैत्रिणी, त्यांच्यासोबत व्यतीत केलेला रम्यकाळ आणि अनेकानेक आठवणी अनेकदा मनाला सुखद गारवा प्राप्त करून देतात. याच ओढीतून या विद्यार्थ्यांनी या मेळाव्याचे आयोजन केले होते.

वर्षानुवर्षे कानात गुंजणारा शाळेच्या घंटेचा मंगलमय आवाज, शालेय नित्य प्रार्थना, हजेरी, शिक्षकांचे अध्यापन, वर्गातील खोड्या आणि अगदी हातावर मिळणारा छडीचा प्रसाद या सर्वच अनुभवांची यानिमित्त शाळेमध्ये पुनरावृत्ती करण्यात आली. शालेय तासिकेनंतर विद्यार्थ्यांनी आपला सध्याचा परिचय आणि कार्यक्षेत्राची ओळख करून दिली. शाळेप्रती आदर आणि शालेय आठवणींना उजाळा देताना अनेकांना शब्द सुचेनासे झाले होते. आवडत्या शिक्षक-शिक्षिकांसोबत बोलण्यात, फोटोसेशन करण्यात दिवस कधी संपला ते समजलेच नाही. शाळा-शिक्षकांप्रती स्नेहभाव अर्पण करत व शाळेला गरजू विद्यार्थ्यांच्या गणवेशासाठी रोख रक्कम भेट देत जड अंतकरणाने अनेकांनी शाळेचा निरोप घेतला.

विद्यालयाच्या मुख्याध्यापिका विभावरी रोकडे यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत व मेळाव्याचे प्रास्ताविक केले. शिक्षकांच्या वतीने अलका कुलकर्णी, उर्मिला कुलकर्णी, कमल आढाव, मंदाकिनी साळुंके, विमल गोलवड, सुदाम साळुंके, कल्पना काळोखे, प्रशांत कुलकर्णी, गणेश उघडे यांनी मनोगत व्यक्त केले. हर्षदा राशिनकर हिने सूत्रसंचालन केले. स्नेह मेळाव्याच्या यशस्वी आयोजनासाठी विद्या देवकाते, दीपिका बोगावत, शितल डागवाले, धनश्री सुडके, संगीता पेदराम, वंदना हेडा, अंजली लुनिया तसेच इतर विद्यार्थिनी व विद्यालयातील शिक्षक, शिक्षकांनी परिश्रम घेतले.

# तथागत बुद्धिस्ट सोसायटी इंडियाचे बुद्ध विहार तेथे बुध्द रुप उपक्रम

## शिरुर कासारला बुध्द रुप दान, खासदार निलेश लंके यांनी उपस्थित राहून केले उपक्रमाचे कौतुक





शिरुर कासारला तथागत बुद्धिस्ट सोसायटी इंडियाचे बुद्ध विहार तेथे बुध्द रुप उपक्रमामध्ये उपस्थित खा. निलेश लंके. शेजारील छायाचित्रात पदाधिकारी आदी.

नगर - शहरातील तथागत बुद्धिस्ट सोसायटी इंडियाच्या वतीने बुद्ध विहार तेथे बुध्द रुप! हा उपक्रम हाती घेण्यात आला असून, याअंतर्गत भव्य बुध्द मुर्ती समाजबांधवांना बुद्ध विहारासाठी विनामूल्य उपलब्ध करून देण्याचे कार्य सुरु आहे. सोसायटीचे अध्यक्ष संजय कांबळे यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम सुरु असून, शिरुर कासार (ता. आष्टी, जि. बीड) येथे भव्य बुध्द रुप दान करण्यात आले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक येथे पार पडलेल्या या सोहळ्याला खासदार निलेश लंके यांनी उपस्थित राहून तथागत बुद्धिस्ट सोसायटी इंडियाच्या माध्यमातून सुरु असलेल्या धार्मिक व सामाजिक कार्याचे कौतुक केले. खासदार लंके म्हणाले की, संघटनेच्या माध्यमातून धार्मिकतेला सामाजिक चळवळीची जोड देवून कार्य सुरु आहे. संजय कांबळे हे चळवळी मधील कार्यकर्ते असून, धम्माचा प्रचार-प्रसार करुन समाजाला जोडण्याचे काम करत आहे. गोर-गरीब व अनाथांचे लग्न लावून देण्यासह धार्मिकतेने युवक-युवतींना दिशा देण्याचे कार्य सुरु असल्याचे त्यांनी सांगितले. या कार्यातून सर्व समाजाला भगवान गौतम बुध्दांचे विचार समजणार असल्याची अपेक्षा व्यक्त केली.

भन्ते धम्मपाल व भन्ते नागसेन यांनी बुध्द वंदनेने कार्यक्रमाची सुरुवात केली. याप्रसंगी संजय कांबळे, डॉ. सिताताई भिंगारदिवे, गौतमी भिंगारदिवे, माजी नगरसेवक राहुल कांबळे, डॉ. वानखडे, डॉ. विश्वास गायकवाड, प्रा. रमेश पगारे, ग्रामपंचायत सदस्स सुनिल जाधव, शेखर पंचमुख, शिवाजी भोसले, अशोक बागुल, आण्णा गायकवाड, संगीता घोडके, अनिता पंडित, कुसुम भिगारदिवे, लता भिंगारदिवे, मायाताई जाधव, सरिता गांगुर्डे, अविनाश भोसले, युवराज सोनवणे, विजय कांबळे, सुरेश पानपाटिल, बाळासाहेब बनकर, प्रमोद शिंदे, संतोष गायकवाड, शाम वाघचौरे, संदिप वाघमारे, भरत शिरसाठ, बाळू गायकवाड, सुभाष कांबळे, नितिन साळवे, विजय साळवे, संतोष कांबळे, मिलिंद आंग्रे, सिध्दांत कांबळे, विष्णू ठोंबे, सुरेश भिंगारदिवे, जिवा कांबळे, अनिकेत भिंगारदिवे, प्रकाश कांबळे, धोडिंबा राक्षे, राम गायकवाड, शांताराम बनसोडे, प्रशांत शिंदे, भिमराज शिंदे, शिवचरण लाल, शरद बनसडे आदींसह समाजबांधव व महिला उपस्थित होत्या.

संजय कांबळे म्हणाले की, महाराष्ट्रात अनेक ठिकाणी असलेले बुद्ध विहार सक्षम करुन समाज जोडण्याचे काम थागत बुद्धिस्ट सोसायटी इंडियाने हाती घेतले आहे. प्रत्येक बुद्ध विहारात चांगल्या पध्दतीने भव्य असे बुध्द रुप असणे आवश्यक आहे. अनेक बुद्ध विहारात बुध्द रुप नसल्याने ते उपलब्ध करुन देण्याचे कार्य सुरु आहे. फक्त मुर्ती नव्हे तर बुध्दांचे विचार देखील देण्याचे काम संघटनेच्या माध्यमातून सुरु आहे. धम्माच्या जागृतीचे बीज रोवण्याचा प्रयत्न आहे. तथागत बुद्धिस्ट सोसायटी ही संस्था बाबासाहेबांच्या विचाराने प्रेरित होऊन योगदान देत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

बुद्ध विहार तेथे बुध्द रुप हा उपक्रम फक्त धार्मिकतेपुरता मर्यादित नसून, तो सामाजिक ऐक्य, ज्ञानप्रसार आणि प्रेरणादायी विचारांच्या प्रसाराचा एक महत्त्वाचा टप्पा ठरत आहे. अशा कार्यक्रमांद्वारे समाजजागृती व बौद्ध विचारांची रुजवणूक ही काळाची गरज असल्याची भावना भन्ते धम्मपाल व भन्ते नागसेन यांनी व्यक्त केली.




केडगाव इंडस्ट्रियल इस्टेटमधील डीपी रस्त्याच्या कामात अडथळा ठरणारी अतिक्रमणे महापालिकेने हटवली.

# केडगाव इंडस्ट्रियल इस्टेटमधील डीपी रस्त्याच्या कामात अडथळा दूर, रस्त्याच्या कामात अडथळा ठरणारी अतिक्रमणे महापालिकेने हटवली

नगर – शहरात शासनाच्या निधीतून रस्त्यांची कामे सुरू आहेत. या कामात अडथळा ठरणारी अतिक्रमणे काढली जात आहेत. केडगाव इंडस्ट्रियल इस्टेटमधील डीपी रस्त्याच्या कामात अडथळा ठरणारी अतिक्रमणे काढण्यासाठी अतिक्रमणधारकांना नोटीसा बजावण्यात आल्या होत्या. त्यांनी स्वतःहून अतिक्रमणे न काढल्याने महानगरपालिकेने कारवाई करून ही अतिक्रमणे हटवली. त्यामुळे डीपी रस्त्याच्या कामातील अडथळा दूर झाला आहे. पावसाळ्यापूर्वी प्रमुख रस्त्यांची कामे पूर्ण करण्यासाठी नियोजन करून त्या दृष्टीने प्रयत्न सुरू असल्याचे आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी सांगितले.

केडगाव इंडस्ट्रियल इस्टेटमधील रस्त्याच्या कामाला सुरुवात झाली आहे. या कामात प्रवेशद्वारासमोर सुमारे १० ते १५ अडथळे होते. या अतिक्रमणधारकांना नोटीसा बजावून मुदत देण्यात आली होती. नोटीस देऊनही अतिक्रमणे न काढल्याने महापालिकेच्या अतिक्रमण विरोधी पथकाने केडगाव इंडस्ट्रियल इस्टेट गेटसमोरील अतिक्रमणे जमीनदोस्त केली. पत्र्याच्या टपऱ्या, पत्र्याचे शेड, हॉटेल, चहाच्या टपऱ्या अशी सुमारे १५ अतिक्रमणे हटवण्यात आली. इंडस्ट्रियल इस्टेटमार्गे केडगाव रोड ते लिंक रोड दरम्यान महापालिकेकडून सिमेंट कॉंक्रिटच्या डीपी रस्त्याचे काम करण्यात येत आहे. या डीपी रस्त्याच्या कामात ही अतिक्रमणे अडथळा ठरत होती. ही अतिक्रमणे स्वतःहून काढून घ्यावीत, अशी सूचना महापालिकेकडून त्यांना करण्यात आली होती. परंतु, अतिक्रमण धारकांनी स्वतःहून त्यांची अतिक्रमणे काढली नाहीत. त्यामुळे महानगरपालिकेने कारवाई करून ही अतिक्रमणे हटवली. अतिक्रमणे हटवून रस्त्याच्या कामात असलेला अडथळा दूर केला आहे.

शहरात अनेक रस्त्यांची कामे सुरू आहेत. पावसाळ्यापूर्वी प्रमुख रस्त्यांची कामे पूर्ण करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. शक्य तेवढे प्रमुख रस्ते खुले करण्यासाठी ती कामे मार्गी लावण्यावर भर देण्यात आला आहे. रस्त्याच्या कामात अडथळा ठरणारी अतिक्रमणे महानगरपालिकेकडून काढण्यात येणार आहेत. ज्या नागरिकांची अतिक्रमणे असतील, त्यांनी ती स्वतःहून काढून घ्यावीत, असे आवाहनही यशवंत डांगे यांनी केले आहे.

# वाळूची चोरटी वाहतूक करणाऱ्यावर 'स्थानिक गुन्हे शाखे'ची कारवाई



वाळूची चोरटी वाहतूक करणाऱ्या चोरट्यास ढंपरसह पकडल्यानंतर त्यासमवेत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

नगर – वाळूचे बेकायदा उत्खनन करुन वाळूची चोरटी वाहतूक करणारा ढंपर स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी सापळा रचून पकडला. या कारवाईत मुद्देमालासह एकास ताब्यात घेतले. कारवाई दरम्यान एक ढंपर चालक ढम्परसह पसार झाला. ही कारवाई श्रीगोंदा तालुक्यातील हंगेवाडी ते बेलवंडी जाणारे रोडवर पिसोरे गावच्या शिवारात ३ मार्च रोजी केली.

स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांना मिळालेल्या माहितीवरुन पोलिस पथक हंगेवाडी ते बेलवंडी जाणाऱ्या रोडवर पिसोरा गावच्या शिवारात सापळा रचून थांबले असता, माहितीप्रमाणे दोन ढंपर येताना दिसले. पोलिसांनी त्यांना थांबण्याचा इशारा केला असता एक ढंपर चालक ढंपर न थांबवता तिथून निघून गेला. त्याच्या मागील ढंपर रोडच्या कडेला थांबवून पाहणी केली. असता मागील हौद्यामध्ये वाळू मिळून आल्याने ढम्पर चालक सत्यम पारस पवार (वय २३, रा. नारायण गव्हाण, ता. पारनेर) यास ताब्यात घेतले. त्याच्याकडे निघून गेलेल्या ढंपरबाबत विचारपूस केली असता ते ढंपर सुनील भीमराव धावडे (रा. चिंचणी, ता. शिरूर, पुणे) यांच्या मालकीचे आहे व ढंपर चालक रोहित सुनील धावडे (रा. चिंचणी ता. शिरुर, जि. पुणे) असे असल्याचे सांगितले. पोलिसांनी त्याच्याकडून २० लाख रुपये किमतीचा ढंपर व ५० हजार रुपये किमतीची बाळू असा २० लाख ५० हजाराचा मुद्देमाल जप्त केला.

याप्रकरणी बेलवंडी पोलीस ठाण्यात बी एन एस चे कलम ३०३ (२) ३ (५) प्रमाणे गुन्हा दाखल केला. ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक दिनेश आहेर यांच्या तपास पथकातील पोलीस अंमलदार दत्तात्रय इंगळे, गणेश लोंढे, भाऊसाहेब काळे, अमोल कोतकर, बाळासाहेब खेडकर, आकाश काळे, मनोज लातूरकर यांनी केली.

# मुलांनी वर्तन, वाणी आणि विचार या तिन्ही गोष्टींवर लक्ष देऊन सदाचरणाचा मार्ग स्वीकारावा

## महेंद्र गंधे यांचे प्रतिपादन; सर्वशाखीय सामुहीक उपनयन संस्कार, मौंजी व्रतबंध संस्कार (मुंज) सोहळा

नगर – भारतीय संस्कृतीत उपनयन संस्काराला अत्यंत महत्त्व आहे. हा एक धार्मिक आणि सांस्कृतिक टप्पा आहे, जिथे मुलगा ब्रह्मचर्य आश्रमात प्रवेश करतो आणि शिक्षणासाठी पात्र होतो. यज्ञोपवित धारण करणे म्हणजे ज्ञान, जबाबदारी आणि शिस्त यांचे प्रतीक स्वीकारणे होय. सामूहिक स्वरूपामुळे हे संस्कार अधिक सर्वसमावेशक आणि किफायतशीर बनतात. यामधून एकतेचा आणि सहकार्याचा संदेशही मिळतो. मौंजी म्हणजे आंतरिक शुद्धतेचा आणि आत्मानुशासनाचा प्रारंभ. मुलांनी आजपासून आपले वर्तन, वाणी आणि विचार या तिन्ही गोष्टींवर लक्ष देऊन सदाचरणाचा मार्ग स्वीकारावा, हीच आजच्या संस्काराची खरी शिकवण असल्याचे प्रतिपादन अखिल भारतीय देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाचे राष्ट्रीय अध्यक्ष महेंद्र गंधे यांनी केले.



अखिल भारतीय देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाज मंडळ, छत्रपती संभाजीनगर शाखेमार्फत आयोजित सर्वशाखीय सामुहीक उपनयन संस्कार/ मौंजी व्रतबंध संस्कार (मुंज) सोहळा पार पडला.

अखिल भारतीय देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाज मंडळ, छत्रपती संभाजीनगर शाखेमार्फत आयोजित सर्वशाखीय सामुहीक उपनयन संस्कार/ मौंजी व्रतबंध संस्कार (मुंज) सोहळा नुकताच दरवर्षी प्रमाणे पार पडला. सदर मुंज समारंभ छत्रपती संभाजीनगर शाखेतर्फे दरवर्षी संस्थेच्या वतीने राबविण्यात येतो. सदर कार्यक्रमास महेंद्र गंधे यांनी उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या. यावेळी सौ.मिनल गंधे, अध्यक्ष नरेश जोशी, उपाध्यक्ष रवी जेहुरकर, सचिव प्रशांत दाभाडकर, कोषाध्यक्ष अंबादास कुलकर्णी, सहसचिव डॉ. अमोल पांडव, कार्यकारणी सदस्य श्रीपाद मुगुटे, नरेश पटवर्धन, वैभव देशपांडे, गोपाल कुलकर्णी, मिलिंद दाभाडकर, कस्तुरे, पारनेरकर, महिला मंडळ अध्यक्षा श्रीमती मोनिका चौधरी, कार्यकारणी सदस्य मयुरी दाभाडकर, सौ.संध्या मुगुटे, सौ.कल्पना जोशी, सौ. विभा देशपांडे, सौ.उत्कर्षा पारनेरकर, सौ.सीमा कस्तुरे, सौ. प्रिया कुलकर्णी, सौ. दीक्षित, सौ.योगिनी देशमुख, सौ. रूपाली कुलकर्णी, सौ.स्वानंदी जोशी, समृद्धी चौधरी, मानसी दाभाडकर, मुंबई ऑन्कोकेअर सेंटरचे देविदास बासरकर, उद्योजक व मंडळाचे प्रमुख दाते व मार्गदर्शक रवींद्र वैद्य, दत्ता भाले, रक्त पेढीचे चिटणीस अण्णा, रवींद्र जोशी आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना गंधे म्हणाले की, आपल्या संस्कृतीची परंपरा पुढे नेण्यासाठी आणि त्यामध्ये आधुनिक शिक्षणाचेही समन्वय साधण्यासाठी अशा कार्यक्रमांची गरज आहे. आपण सर्वांनी यासाठी एकत्र यावे, हेच या क्षणाचे महत्त्व आहे.

तसेच संबंधित संस्था ही देशातील विविध ठिकाणी समाज उपयोगी कामांसाठी कार्यरत असती. सदर संस्थेचे मध्यवर्ती कार्यालय दादर मुंबई येथे आहे. मध्यवर्ती संस्थेच्या व उपसंस्थांच्या माध्यमातून समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक सहाय्य केले जाते. तसेच सदस्यांच्या माध्यमातून विविध वैद्यकीय कॅम्पसह विविध समाजोपयोगी उपक्रम राबविले जातात.

मंडळाचे उपनयन संस्कार आयोजित करण्याचे हे ४ थे वर्ष होते तसेच ब्राह्मण समाजाच्या रूढी परंपरा मुलांना कळव्यात या दृष्टीने मंडळ वर्षभर अनेक कार्यक्रमाचे आयोजन करत असते त्यात रामरक्षा, मनाचे श्लोक, पठन स्पर्धा होत असते श्रावणी तसेच ब्राह्मण उद्योजकांसाठी दिवाळी प्रदर्शन, महिलांसाठी पैठणी सारखे स्पर्धा तसेच ब्राह्मण समाजाच्या रूढी परंपरा संदर्भातील सण, वार आणि भोजन पदार्थ बनविण्याची स्पर्धा आयोजित करण्यात येत असते.

# मागील भांडणाच्या कारणावरुन तरुणावर कोयत्याने हल्ला

## बोल्हेगाव येथील घटना

नगर – मागील भांडणाचा मनात राग धरून चौघांनी २५ वर्षीय तरुणास रस्त्यात अडवून शिवीगाळ दमदाटी करीत लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन ठार मारण्याची धमकी देऊन कोयत्याने वार करुन जखमी केले. ही घटना ४ मे रोजी बोल्हेगाव येथील भारत बेकरी समोर रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास घडली.

याबाबत पवन रमेश शिंदे (वय २५, रा. गांधीनगर, बोल्हेगाव, अ.नगर) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की फिर्यादी हे त्यांची बुलेट मोटारसायकल (क्र. एम एच ०२ टी एस ४८ १० ) घेऊन मित्र शुभम कळसकर (रा. गांधीनगर) याच्यासोबत फेरफटका मारण्याकरिता बोल्हेगाव येथील भारत बेकरी येथे आले असता त्याचवेळी यश शिरसाठ, सुलेमान शेख, राहुल साबळे, व रावण (पूर्ण नाव पत्ता माहीत नाही) यांनी मागील भांडणाचा मनाचा राग धरून फिर्यादी यांची मोटारसायकल अडवून फिर्यादी व त्यांचा मित्र शुभम यास अचानक लाथा बुक्क्यांनी मारहाण करुन ठार मारण्याची धमकी दिली. यश शिरसाठ व सुलेमान शेख यांनी त्यांच्या हातातील कोयत्याने फिर्यादीच्या हातावर, बोटावर वार करुन त्यांना जखमी केले. या मारहाणीत फिर्यादी हे गंभीर जखमी झाले.

याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात पवन शिंदे यांनी दिलेले फिर्यादीवरून यश शिरसाठ सुलेमान शेख राहुल साबळे व रावण यांच्याविरुद्ध बी एन एस ११८ (१), ११५ (२), ३५२, ३५१ (२) (३), ३ (५) सह आर्म अ‍ॅक्ट ४ /२५ प्रमाणे गुन्हा दाखल केला. पुढील तपास पोलीस नाईक रमेश शिंदे हे करीत आहे.

# चासच्या पेट्रोल पंपावरील कर्मचाऱ्याने केली चोरी

नगर – पेट्रोल पंपावर काम करणाऱ्या दोन परप्रांतीय कर्मचाऱ्यांनी पेट्रोल पंपावरील दैनंदिन व्यवहारातील ५५ हजार ५५० रुपये रोकड चोरुन नेली. ही घटना नगर पुणे रोडवरील चास शिवारातील अश्विन ऑटोमोबाईल्स पेट्रोलपंप येथे ३ मे रोजी रात्री साडेबारा वाजता सुमारास घडली.

याबाबत पेट्रोलपंप वरील मॅनेजर अभय विठ्ठल दातीर (वय ४५, रा. केडगाव) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, चास शिवारातील अश्विन ऑटोमोबाईल्स या पेट्रोल पंपावर विकी गुप्ता (रा. राम मुरत भांडवान, पोस्ट बालकमाऊ, जि. कौशबी उत्तर प्रदेश) आणि अजित कुमार (रा. जोनपुर, उत्तर प्रदेश) हे परप्रांतीय कामगार कामाला होते. पेट्रोल पंपावर काम करीत असताना पेट्रोल विक्रीतून आलेले पैसे पेट्रोल दिवसभर पंपावरील कर्मचाऱ्याकडेच असतात. या पैशाचा कामावरुन सुट्टी होण्याअगोदर हिशोब करुन ऑफिस मध्ये रोकड जमा करुन हिशोब द्यावयाचा असतो. परंतु तीन मे रोजी विकी गुप्ता व अजित कुमार यांनी ऑफिसमध्ये पैशाचा हिशोब न देता दिवसभरातील त्यांच्याकडे जमा झालेली ५५ हजार ५५० रुपयाची रक्कम घेऊन रात्री साडेबारा वाजता सुमारास निघून गेले.

याप्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात पेट्रोल पंपावरील मॅनेजर अभय दातीर यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन विकी गुप्ता व अजित कुमार यांच्याविरुद्ध बी एन एस ३०६ प्रमाणे गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस हवालदार माने करीत आहेत.


**मा. सहायक निबंधक सहकारी संस्था (परसेवा)**

**महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्या. पुणे**

पत्ता– सी. टी. सी. क्र. ११९/बी, प्रमिला अपार्टमेंट, तिसरा मजला, लकाकी रोड, मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर, पुणे – १६

## जाहीर प्रगटन

लक्ष्मीनारायण सहकारी नागरी पतसंस्था मर्या., अहमदनगर, मा. सहायक निबंधक सहकारी संस्था (परसेवा) महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्या. संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये वसुली प्रमाणपत्र मिळण्यासाठी दावा दाखल केला आहे. त्या सर्व थकबाकीदार कर्जदार व त्यांचे जामिनदार त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी संधी देऊन दि. २३/०४/२०२५ रोजी मा. सहायक निबंधक सहकारी संस्था (परसेवा) महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्या., जि.पुणे, व्दारा पत्ता– सरस्वती नागरी सहकारी पतसंस्था मर्या., महात्मा फुले चौक, व्यापारी संकुल, मार्केटयार्ड, पहिला मजला, अहमदनगर या कार्यालयात सुनावणीसाठी बोलविण्यात आले होते. परंतु खालील तक्त्यातील कर्जदार व जामिनदार यांना वेळोवेळी नोटीस दिलेल्या पत्त्यावर RPAD व्दारे पाठवूनही ते सुनावणीस हजर राहिलेले नाहीत. आता त्यांना शेवटची संधी देऊन त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी सरस्वती नागरी सहकारी पतसंस्था मर्या., महात्मा फुले चौक, व्यापारी संकुल, मार्केटयार्ड, पहिला मजला, अहमदनगर या कार्यालयात दिनांक ०९/०५/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता सुनावणीसाठी बोलविण्यात येत आहे. याही वेळी सुनावणीस गैरहजर राहिल्यास त्यांचे सदरील दाव्याबाबत काही एक म्हणणे नाही असे गृहीत धरून वसुली प्रमाणपत्र बाबतचा दावा निकाली काढण्यात येईल. याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

| अ.नं. | दावा क्र. | कर्जदार / जामीनदारांची नावे | पत्ता | दावा रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| १. | ७५ | मुनोत उमेश सुभाष – जामिनदार | बोरुडे मळा, बालिकाश्रम रोड, भुतकरवाडी, अहमदनगर | १,६८,८५९.०० |
| २. | ७६ | भट गौतम प्रदीप – जामिनदार | २४५७, तांबटकर गल्ली, तेलीखुंट, अहमदनगर | ४,२५,५०९.०० |
| ३. | ७७ | गांधी गणेश सुखलाल – जामिनदार | ४३६६, ब्राम्हण गल्ली, दत्त लॉज शेजारी, माळीवाडा, अहमदनगर | १०,१०,०५६.०० |
| ४. | ७८ | गायकवाड चंद्रकांत सुभाष – कर्जदार<br>गोंदके चंद्रकांत मनोहर – जामिनदार | स. नं. २१५/३ब/२, प्लॉ.नं. ११, दुधसागर सोसा., अरणगाव रोड, केडगांव देवी मागे, अहमदनगर<br>५९, श्री स्वामी समर्थ, बँक कॉलनी, सुवर्णानगर, केडगाव अंबिकानगर, अहमदनगर | ९,३६,५१९.०० |
| ५. | ७९ | गारुडकर सुनिल मनाजी – कर्जदार<br>भंडारी चैनसुखलाल रमेश – जामिनदार | प्लॉ. नं. ३ दातरंगे मळा नालेगांव गारूडकर वाडा अहमदनगर<br>१५, रामकृष्ण अपार्टमेंट, निंबाळकर गल्ली, जुंना मंगळवार बाजार, शनिचौक, अहमदनगर | ६,२१,०८५.०० |
| ६. | ८० | येवलेकर प्रणव प्रकाश – कर्जदार<br>सेतवाल सारंग हिरालाल – जामिनदार<br>वाळके आनंद भगवान – जामिनदार | घ.नं. २६५ सि.स.नं. ३ डी जाधव मळा, बालिकाश्रम रोड, अहमदनगर<br>सत्कार कॉलनी, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहमदनगर<br>४३०१, आनंदी बाजार, पटवर्धन चौक, अहमदनगर | ६,९३,४०१.०० |

अहमदनगर
दि. ०५/०५/२०२५

शिक्का

स्वाक्षरी
**हर्षित वसंतराव तावरे**
मा. सहायक निबंधक सहकारी संस्था (परसेवा)
म. राज्य सह. पतसंस्था फेडरेशन मर्या., पुणे


# सेंटर ऑफ एक्सलन्स राज्यस्तरीय समितीवर प्रा. डॉ. भागवत परकाळ



नगर – महाराष्ट्र राज्य स्वातंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असलेल्या करिअर कट्टा उपक्रमांतर्गत महाराष्ट्रातील व महाविद्यालयातील तरुणांसाठी स्पर्धा परीक्षा अंतर्गत सेंटर ऑफ एक्सलन्स हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत राज्यभरातून सहा सदस्यांची निवड करण्यात येते. त्यात अहिल्यानगर जिल्ह्यातील अहमदनगर महाविद्यालय येथील प्रा.डॉ.भागवत परकाळ यांची सेंटर ऑफ एक्सलन्स राज्यस्तरीय समितीवर सदस्य म्हणून निवडण्यात आले आहे.

याबद्दल भा.पां.हिवाळे संस्थेचे अध्यक्ष डॉ. आर. जे. बार्नबस यांनी आणि महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. नोएल पारगे, उपप्रचार्य प्रा.दिलीपकुमार भालसिंग, उपप्रचार्य प्रतिमकुमार बेदरकर, कायम विनाअनुदान विभाग प्रमुख प्रा. डॉ. सय्यद रज्ञाक, महाविद्यालयाचे रजिस्ट्रार (प्रबंधक) श्रीमती कल्पलता भिंगारदिवे आणि महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांनी त्यांचे या निवडीबद्दल अभिनंदन केले.










